शनिवार, १४ ऑक्टोबर २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ७१
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 14 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-70 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

## महत्त्वाची बातमी

## इस्त्रायल-हमास युद्ध चिघळणार

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** इस्त्रायल आणि हमासदरम्यान सुरू झालेले युद्ध सातव्या दिवशीही सुरू आहे. हे युद्ध लवकर संपुष्टात येईल असे कोणतेही चिन्ह दिसत नाही. त्यामुळे गाझा पट्टीत हमासविरोधात जमिनीवरील मोहीम सुरू करण्यासाठी सैन्य सज्ज होत असल्याचे इस्त्रायलच्या लष्करातर्फे सांगण्यात आले. दरम्यान, २४ तासांच्या आत उत्तर गाझा रिकामे करण्याचे आदेश इस्त्रायलने दिले आहेत. यामुळे जवळपास ११ लाख नागरिकांना गाझातून स्थलांतरीत व्हावं लागणार आहे. इस्त्रायलच्या एकूण लोकसंख्येच्या ५० टक्के ही लोकसंख्या आहे.
पॅलेस्टाईनची दहशतवादी संघटना हमासने गाझा पट्टीवरून इस्त्रायलवर हल्ला चढवला आहे. त्यामुळे इस्त्रायलनेही गाझा पट्टीवरील नागरिकांची नाकाबंदी केली आहे.
पाणी, अन्न, इंधन पुरवठा बंद करण्यात आला आहे.
तर, हमास ओलिसांची सुटका करत नाही तोपर्यंत गाझा पट्टीमध्ये कोणतीही मानवतावादी मदत पोहोचू दिली जाणार नाही असा इशारा इस्त्रायलचे ऊर्जामंत्री इस्त्रायल काट्झ यांनी दिला. दुसरीकडे इस्त्रायलने गाझातील नागरिकांना स्थलांतर करण्याचे निर्देश दिले आहेत.
परंतु, यामुळे विनाशकारी मानवतावादी परिणामांशिवाय हे आदेश अशक्य असल्याची प्रतिक्रिया संयुक्त राष्ट्राचे प्रवक्ते स्टीफन दुजारिक दिली आहे. म्हणजेच, यामुळे विनाशकारी मानवतावादी परिणाम होतील, असा इशारा देण्यात आला आहे.

# पोरखेळ करताय का ?

## सुप्रीम कोर्टाने काढली राहुल नार्वेकरांची खरडपट्टी



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयात शुक्रवारी विधानसभा अध्यक्षांच्या दिरंगाई प्रकरणावर सुनावणी पार पडली. ठाकरे गट आणि राष्ट्रवादीच्या याचिकांवर एकत्र सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी किमान दोन महिन्यात निर्णय घेणे आवश्यक असल्याचे सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी म्हटले आहे. तसेच, विधानसभा अध्यक्षांना कोणीतरी सांगावे की, हे प्रकरण त्यांनी गांभीर्याने घेण्याची गरज आहे, असेही सरन्यायाधीश म्हणाले आहेत. पोरखेळ करताय का? असे म्हणत सरन्यायाधीशांनी अत्यंत कडक शब्दांत राहुल नार्वेकरांना सुनावले आहे.**

**विधानसभा अध्यक्षांच्या कार्यपद्धतीवर ताशेरे :** अध्यक्षांचे वेळापत्रक आम्हाला अजिबात मान्य नाही, असे म्हणत सरन्यायाधीश विधानसभा अध्यक्ष आणि त्यांच्या कार्यपद्धतीबाबत प्रचंड नाराज झाले होते. फक्त वेळकाढूपणाचे धोरण अध्यक्ष राबवत असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे, असे सरन्यायाधीशांनी म्हटले आहे. तर राहुल नार्वेकरांना स्पष्ट शब्दांत आदेश देण्यात आले आहेत की, मंगळवारी विधानसभा अध्यक्षांनी नवं वेळापत्रक सादर करावे. जर निश्चित वेळापत्रक अध्यक्षांकडून येऊ शकले नाहीतर मात्र नाईलाजास्तव सर्वोच्च न्यायालयाला विशिष्ट टाईमलाईन आखून द्यावी लागेल. दोन महिन्यांची टाईमलाईन असून शकते, ज्यामध्ये अध्यक्षांना बंधनकारक असेल, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे.

सरन्यायाधीशांनी विधानसभा अध्यक्षांची बाजू मांडणारे न्यायाधीश सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनाही स्पष्ट शब्दांत सुनावले आहे. तसेच, अपात्रता प्रकरणावरील सुनावणीसाठी नार्वेकरांनी ठरवलेल्या वेळापत्रकावरही सरन्यायाधीशांनी ताशेरे ओढले आहेत. कायदा तुम्हाला बसवून शिकवावा लागेल, असेही सरन्यायाधीश सुनावणीदरम्यान म्हणाले आहेत. आम्ही हे जाणतो की विधानसभा अध्यक्षांचे पद हे संसदीय सरकारचा भाग आहे, त्यामुळेच आम्ही कुठलीही टाईमफ्रेम देत नाही आहोत, पण ते वेळेत निर्णय देत नसतील तर त्यांना जबाबदार धरावेच लागेल, असेही सरन्यायाधीशांनी म्हटले आहे. जर निश्चित वेळापत्रक विधानसभा अध्यक्षांकडून आले नाही, तर मात्र आम्हाला आदेश द्यावे लागतील आणि त्यानंतर ठरवून दिलेल्या मर्यादेत अध्यक्षांना निर्णय द्यावाच लागेल, असेही सरन्यायाधीश म्हणाले आहेत.
निर्णय घेण्याचे सर्वाधिकार अर्थातच अध्यक्षांकडे आहेत. परंतु, 11 मे रोजी या संपूर्ण प्रकरणातील निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आणि अपात्रतेचा निर्णय घेण्याचे सर्वाधिकार अध्यक्षांकडे सोपवले होते, याला तब्बल पाच महिने उलटून गेले आहेत.
परंतु, पाच महिन्यांनंतरही अपात्रतेची सुनावणी वेगाने पुढे का जात नाही? याबाबत ताशेरे ओढत अत्यंत कडत शब्दांत विधानसभा अध्यक्षांना सुनावले आहे. न्यायालयाने निर्देश दिल्यानंतर विधानसभा अध्यक्षांची भूमिका काय असणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. सुनावणीनंतर ठाकरे गटाचे वकील अनिल परब यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश आणि रिजनेबल टाईम दिला होता.
सहा महिने झालेत, चालढकल सुरु होती. वेळापत्रावर आमच्या वकिलांनी आक्षेप घेतला होता. पण त्यांच्याकडून जाणून बुजून वेळ काढला जात असल्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे. अध्यक्षांचे वकिल तुषार मेहतांनी अशिलांशी बोलून मंगळवारी नवीन टाईम शेड्यूल देतो असे म्हणले आहेत.
घटनेची दहावी सूची पायदळी तुडवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

## अफवानंतर ज्ञानराधात ठेवी काढण्यासाठी प्रचंड गर्दी

### बीड येथे आयकर विभागाच्या छाप्याच्या वृत्ताने खळबळ

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** ज्ञानराधा मल्टीस्टेट को सोसायटी बाबत ठेवीदारात अफवा पसरल्याने परतूर येथील ठेवीदारांनी ज्ञानराधा मल्टीस्टेट को. सोसायटीमधे ठेवी काढण्यासाठी प्रचंड गर्दी केली होती.
बीड येथील प्रसिद्ध उद्योग समुहावर आयकर विभागाच्या पथकाने छापेमारी केल्याने ज्ञानराधा मल्टीस्टेट को सोसायटी संस्थे विषयी परतूर शहरात विविध अफवा पसरल्या. यामुळे शहरातील ज्ञानराधा शाखेत बाकी दारांनी पैसे काढण्यासाठी प्रचंड गर्दी केल्याने बँक व्यवस्थापनावर मोठा परिणाम झाला. संस्थेत ठेवलेल्या एफडी तसेच बचत व अन्य




गुंतविलेले पैसे काढण्यासाठी नागरिकांनी रात्री उशिरापर्यंत गर्दी केली होती. ठेवीदारांमधे अफवा पसरल्याने बाहेरगावाहूनही उशिरापर्यंत ठेवीदार संस्थेत धाव घेताना दिसून आले.

अफवांमुळे ठेवीदारांमधे प्रचंड दहशतीचे वातावरण दिसून आले. परतूर येथील ज्ञानराधा मल्टीस्टेट संस्थेसमोर ठेवीदाराची पैसे काढण्यासाठी झालेली गर्दी.

**काळजीचे कारण नाही :** ज्ञानराधा मल्टीस्टेट को संस्थेत गर्दी झाली. ठेवीदारांनी अफवावर विश्वास ठेवू नये. संस्था प्रत्येक खातेदाराला त्याच्या ठेवी आणि पैसे देणार आहे. रात्री उशिरापर्यंत ही शाखा सुरू राहणार आहे. संस्थेला कुठलाही धोका नाही.
**-गणेश पिंपरकर, शाखा व्यवस्थापक, ज्ञानराधा मल्टीस्टेट**
बीड येथील प्रसिद्ध उद्योग समुहाव आयकर विभागाची पथकाने छापेमारी केली. या उद्योग समूहाचा आणि या संस्थेचा संबंध असल्याने संस्था बंद होण्याच्या अफवाने मी ठेवलले पैसे काढण्यासाठी संस्थेत येऊन रांगेत उभा आहे. **-गोपीनाथ सोळंके, खातेदार सिंगोना**

## भारत-पाक सीमेजवळ छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याचा प्रस्ताव

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** छत्रपती शिवाजी महाराजांची वापरलेली वाघनखे लंडनहून भारतात आणण्याच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करून राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर-वर्धा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे उपराजधानीत आगमन झाले. यावेळी ढोल-ताशांच्या गजरात त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मुनगंटीवार म्हणाले की, वाघनखांसह महाराजांची जगदंबा तलवार आणि लंडनच्या संग्रहालयातील महाराष्ट्राच्या वारसाची साक्ष देणाऱ्या इतर वस्तूही लवकरच भारतात आणण्यासाठी आपण पूर्ण प्रयत्न करू. लंडन आणि जपानचा दौरा आटोपल्यानंतर मी भारतात परतलो त्यावेळी आपले भव्यदिव्य स्वागत करण्यात आले. शिवभक्तांच्या या प्रेम आणि आपुलकीने मी भारावलोय. आम्ही पुणेकर या संस्थेने श्रीनगरातील कुपवारा जिल्ह्यात भारत-पाकिस्तान सीमेजवळ छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्याचा प्रस्ताव दिला आहे.

## शिक्षणासाठी सावित्रीच्या लेकींना करावा लागतोय जीवघेणा प्रवास


### फुलंब्री तालुक्यात एका जीपमध्ये कोंबतात ३० ते ५० विद्यार्थी

आधुनिक केसरी न्यूज

सुधाकर जेठे
फुलंब्री : तालुक्यातील आडगाव बुद्रुक, पिंपळगाव, कान्होरी, मसला, रेल, वाहेगाव येथील विद्यार्थी हे शिक्षण घेण्यासाठी त्यांचा जीव धोक्यात टाकत आहेत. विद्यार्थिनींना जीपच्या छतावर बसून शाळेत जाण्यासाठी रोज कसरत करावी लागते. एका जीपमध्ये ३० ते ५० मुलींना कोंबल्या जाते अशी चर्चा आहे. आडगाव बुद्रुक : शिक्षणाचा स्तर सुधारावा यासाठी सरकारने घोषणा केली. मात्र, दुसरीकडे ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणासाठी जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. फुलंब्री तालुक्यातील आडगाव बुद्रुक, वाहेगाव, पिंपळगाव, मसला, गावांमध्ये विदारक चित्र पाहायला मिळतंय. जवळपास दोनशे मुले - मुलींना एकाच बसमध्ये किंवा जीपच्या टपावर बसून प्रवास करावा लागतो. तर घरी जाताना सात ते आठ किलोमीटर पायी प्रवास करावा लागत असल्याने ग्रामीण भागात शिक्षण किती जिकरीचे झाले याचा प्रत्यय येतो. जीवघेण्या प्रवास बाबत सांगताना विद्यार्थिनींना अश्रू अनावर झाले. एकीकडे सकारात्मक सरकारी घोषणा तर दुसरीकडे विदारक चित्र असल्याने शिक्षणाचा स्तर खरंच सुधारतोय का? हा प्रश्न निर्माण होतो. एका जीपमध्ये ३० ते ५० मुलींना कोंबले जाते, अशी चर्चा आहे.
संभाजीनगर-पिशोर या एकाच बसला एकाच वेळी जवळपास दोनशे मुलांना शाळेत घेऊन जावं लागत आहे. याआधी बाबरा मार्गाची बस सुरू असल्याने अडचण येत नव्हती. मात्र राज्य परिवहन विभागाने अचानक ती बस बंद केल्याने विद्यार्थ्यांना पायपीट करावी लागतं आहे. बसमध्ये विद्यार्थ्यांना जागा राहात नाही :
विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी असलेली बाबराकडे जाणारी बस अचानक बंद करण्यात आली. त्यामुळे शाळेच्या वेळी पिशोरकडे जाणाऱ्या बसचा आधार मिळाला. मात्र त्यात अनेक प्रवासी आधीच प्रवास करत असतात. त्यात महिलांना अर्धे तिकीट करण्यात आल्याने बसमध्ये महिलांची गर्दी चांगलीच वाढली आहे. त्यामुळे वेळेवर बस येऊनही त्यात जागा मिळवणे विद्यार्थ्यांना अडचणीचे जाते. अवघे पन्नास ते साठ प्रवासी घेऊन जाण्याची क्षमता असणाऱ्या बसमध्ये आधीचे प्रवासी आणि दीडशे मुली शाळेत सोडण्याची वेळ येते. त्यामुळे विद्यार्थिनींना अक्षरशः एकमेकांच्या अंगावर बसून प्रवास करावा लागतो. बसमधे जागा मिळाली नाही तर ग्रामीण भागात प्रवासी वाहतूक करणाऱ्या काळी पीली म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जीपच्या छतावरही बसून जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. हा प्रवास धोकादायक असला तरी शिक्षण घेण्यासाठी करावा लागतो. मात्र या अडचणींमुळे अभ्यास करायला वेळ मिळत नसल्याने शैक्षणिक नुकसान होत आहे, अशी भावना मुलींनी व्यक्त केली.



**घरी येण्यास होतो उशीर :** अनंत अडचणींचा सामना केल्यावर शाळेत आलेल्या मुलींना घरी जाताना मात्र अक्षरश : पायी जावे लागते. शाळा सुटल्यावर वाहन उपलब्ध झाले नाही तर पायी घर गाठावे लागते. दिवसभर शाळेत अभ्यास करून दमलेल्या अवस्थेत सात ते आठ किलोमीटरचा प्रवास चालत करावा लागतो. त्यामधे मद्यपीदेखील येता जाता टोमणा देत त्रास देतात. त्यामुळे काही वेळा भीती वाटत असल्याची भावना विद्यार्थिनींनी व्यक्त केली. तर मुली घरी येईपर्यंत आई वडिलांना चिंता असते ती वेगळीच. त्यामुळे तातडीने बस सुरू करण्याची मागणी विद्यार्थिनी आणि पालकांनी व्यक्त केली. एकीकडे शिक्षणिक धोरण चांगले करण्याच्या वल्गना करणारे सरकार या प्रश्नांकडे कधी लक्ष देणार, असा प्रश्न उपस्थित होतो.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# ऐसी अक्षरे रसिके

आधुनिक केसरी

शर्वरी. एक अत्यंत उत्साही आणि सतत हसतखेळत राहणारी तरुणी ! तिच्या लाघवी स्वभावाने सगळ्यांनाच आपलंसं करून घेणारी. तिचं बोलणं ऐकण्यासाठी सगळेच उत्सुक असायचे. पण अचानक एक मोठा अपघात झाला. शर्वरीची वाचा हरपली. बोलकी शर्वरी एकदमच शांत शांत राहू लागली. तिची जिवलग मैत्रीण सुषमा तिला भेटायला आली. शर्वरी काही बोलू शकत नव्हती. शर्वरीचे डोळे भरून आले. सुषमा आणि शर्वरी एकमेकींच्या गळ्यात पडून खूप रडल्या. शर्वरी थोडी शांत झाल्यावर सुषमाने आपल्या पर्समधून एक नवीकोरी डायरी आणि पेन काढले. शर्वरीच्या हातात ठेवले. एक पाटी पेन्सिल सुद्धा तिच्या हाती दिली. ' शर्वरी, काही काळजी करू नकोस. जशी तुझी वाचा अचानक अपघाताने गेली, तशीच ती एक दिवस परत सुद्धा येईल. मला विश्वास आहे. पण तोपर्यंत तू तुला जे काही सांगायचं ते या पाटीवर लिहून सांगत जा. जेव्हा तुला वेळ असेल तेव्हा तुझ्या भावना या डायरीत लिहीत जा. ' सुषमा म्हणाली. तशाही परिस्थितीत शर्वरीचा चेहरा खुलला. तिनं पाटीवर लिहिलं, ' सुषमा, बस थोडा वेळ. तू आल्यानं मला किती आनंद झाला ! आपण दोघी थोडी थोडी कॉफी घेऊ या. तू बोलत जा. मी लिहून सांगेन. ' शर्वरी आता बोलत जरी नव्हती, तरी तिला लिहिता येत असल्याने आपल्याला जे काही सांगायचं ते ती लिहून सांगायची. शर्वरीच्या मनात आलं, लिहिण्याची सोयच मानवाला उपलब्ध नसती तर ! कल्पनाच करवत नाही. आज चंद्र आणि मंगळावर पोहोचलेला आणि सूर्यावर चढाई करायची तयारी असलेल्या मानवाची प्रगती झाली असती ? निसर्गाने मानवाला काही वैशिष्ट्ये बहाल केली. त्यामुळेच तो इतर प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ आणि वरचढ ठरला. तो दोन पायांवर चालू शकतो आणि हातांचा वैशिष्ट्यपूर्ण वापर आपल्या संरक्षणासाठी आणि प्रगतीसाठी करू शकतो. माणसाला बोलता येतं, तो विचार करू शकतो. त्याला हसता येतं. आपल्या हाताची पाचही बोटं त्याला हवी तशी वाकवता येतात, फिरवता येतात. त्याची ताकदवान मूठ बनवता येते. आणि त्याच वैशिष्ट्यपूर्ण हातांच्या बोटांचा वापर करून तो लिहायला शिकला. माणूस ज्या दिवशी लिहायला शिकला असेल, तो दिवस मानवाच्या इतिहासातील म्हणजे क्रांतिकारी दिवस ! तो दिवस म्हणजे मानवाच्या उज्ज्वल भवितव्याची पहाट !



## आनंदी पहाट

# जीवनाच्या नवीन प्रवासात संलग्नता महत्वाची

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

विद्यार्थ्यांना सध्याच्या व्यावसायिक परिस्थिती आणि आव्हानांशी परिचित होण्यासाठी अतिथी व्याख्याने हा सर्वोत्तम मार्ग असतो. विद्यार्थ्यांना सध्याच्या समस्यांबद्दल जाणून घ्यायचे असते, जे उद्योग व्यावसायिकांना तोंड देत आहेत आणि त्यावर उपाय देखील शोधून काढत आहेत, त्यांच्याकडून ती अंतर्दृष्टी मिळू शकते. अतिथी व्याख्याते हे बहुधा तज्ज्ञ उद्योग व्यावसायिक असतात, ज्यांनी व्यवसायाच्या जगात महत्त्वपूर्ण योगदान दिलेले असते. ज्या पुरुषाने / स्त्रीने हे स्वतः केले आहे, त्यांच्याशिवाय विद्यार्थ्यांना व्यवस्थापन आणि चांगल्या व्यावसायिक रणनीतींबद्दल कोणीही चांगले शिकवू शकत नाही. विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन करण्यासाठी यशस्वी माजी विद्यार्थी सदस्यांना आमंत्रित करणे महाविद्यालयांसाठी सर्वव्यापी असते. असे मार्गदर्शन भरपूर मूल्यवर्धनाने भरलेली असू शकते आणि सर्वात चांगली गोष्ट म्हणजे विद्यार्थी नवीन जीवन प्रवासाशी सहजपणे संलग्न होऊ शकतात. यशस्वी माजी विद्यार्थी काही वर्षांपूर्वी विद्यार्थ्यांच्या ठिकाणी होते; त्यांच्या प्रवासाबद्दल जाणून घेणे विद्यार्थ्यांना प्रेरणा देत असते आणि त्यांना यशाप्रप्तीचा एक चांगला मार्ग दाखवते. विद्यार्थी अनेकदा त्यांच्या आवडीनुसार करिअरचे मार्ग बदलतात आणि विशिष्ट विषयांबद्दल जाणून घेण्याचा अतिथी व्याख्याने हा सर्वोत्तम मार्ग आहे. प्रत्येक विषय विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या अनेक संधी उघडतो, परंतु ते अनेकदा गोंधळलेले असतात आणि विशिष्ट विषयांमधील संधींबद्दल त्यांना माहिती नसते. तज्ज्ञ व्यक्ती विद्यार्थ्यांना या संधींबद्दल ज्ञान देऊ शकतात आणि त्यांना त्यांच्या करिअरची दिशा निवडण्यास मदत करू शकतात. विद्यार्थ्यांना सैद्धांतिक संकल्पनांच्या व्यावहारिक उपयोगाची माहिती मिळाल्यावर स्वारस्य पुनर्जीवित करतात. सैद्धांतिक संकल्पनांसह कार्यरत जगात होत असलेल्या बदलांबद्दल ऐकणे विद्यार्थ्यांसाठी रोमांचक आणि अंतर्ज्ञानी असू शकते. विद्यार्थ्यांना नवीन शिक्षकांशी संवाद साधता येतो आणि शिकण्याच्या तसेच शिकवण्याच्या पर्यायी मार्गांचाही अनुभव घेता येतो.



आधुनिक केसरी

**अद्वैतात न्हाले | भक्तजन ||**

कान्होबाच्या कृपे | झालो मी पावन ||
पापाचे क्षालन | झाले आज ||१||
प्रारब्धाचे भोग | सुखावले आता ||
संवाद ऐकता | गीताईचा ||२||
वृंदावनी वेणु | वाजवी मुरारी ||
राधा ही बावरी | मन झाले ||३||
सारथ्य भक्ताचे | करितो श्रीरंग ||
उभा पांडुरंग | विटेवरी ||४||
माधव केशव | द्वैत ना उरले ||
अद्वैतात न्हाले | भक्तजन ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी

जन्म दुःखाचा अंकुर ।जन्म शोकाचा सागर ।
जन्म भयाचा डोंगर ।चळेना ऐसा ॥१॥
जन्म कर्माची आटणी ।जन्म पातकाची खाणी
।जन्म काळाची जाचणी ।निच नवी ॥२॥
जन्म कुविद्येचें फळ ।जन्म लोभाचें कमळ ।
जन्म भ्रांतीचें पडळ ।ज्ञानहीन ॥३॥




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

मन मुख गुरु बन जग ठगे, अनधिकार पद लेय । नष्ट करे संसार को, जीव काल घर देय ।।४३।।(स्वर्वेद पंचम मण्डल त्रयोदश अध्याय) ०५/१३/४३

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :

आपल्या मनाचा स्वतन्त्रगामी, मनमुखी व्यक्ती जो सद्गुरू सिद्धांत-ज्ञान शून्य आणि त्यांच्या नियम , मर्यादा तसेच आदेशाविरुध्द आचरण करणारा आहे तो अनधिकृतपणे गुरूपद घेऊन जगाला धोका देतो , तसेच खऱ्या अनुरागी भक्तांचे जीवन नष्ट करून त्यांना काळाच्या घरी पाठवतो. मनमुखी गुरू बनून दुसऱ्यांना उपदेश करणे हा सन्तमताच्या सत्य-सिद्धांताविरुध्द व्यवहार आहे. आपल्या मनाने कोणी गुरू होऊ शकत नाही. गुरू आपले ज्ञान, जीवन आणि बल आपल्या प्रिय सुपात्रास देऊन सद्गुरू पदाधिकारी बनवतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## शून्यत्वनिरसन

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

एक म्हणतो सर्व काही पूर्व पुण्याईवर मिळते.तर एक म्हणतो भरपूर मेहनत करावी तेव्हा काही मिळते. एक होतो सगळा भार देवावर सोपवावा व आपण स्वस्थ असावे आपलं कल्याण करण्यासाठी रामराया आहे तो सर्व काही पाहुन घेईल तर एक म्हणतो अहो कसला देव घेऊन बसलात, ***देव हे काही नसते ,तो तर सज्जनांचा अंतचं पहात असतो. तर एक म्हणतो दोष देवाचा नाही, सज्जनांचा छळ व्हावा हा युगधर्मचं आहे.एकंदर ज्याची त्याची परिस्थिती पाहून कुणाला आनंद होतो,तर कुणाला वाईट वाटते.तर कुणी जे जे समोर आलं आहे ते ते पहात रहावे. आपण कुणाला दोष देऊ नये. कुणाचं वाईट करू नये,वाईट गोष्टींचा त्याग करावा.

# वेळीच जागे होऊन योग्य रस्त्याला लागा

आधुनिक केसरी



कोणत्याही कर्माची सुरुवात हेतूपासून म्हणजे वासनेपासून होत असते. जन्म हा देखील वासनेतून निर्माण होतो. गंगेचा उगम अत्यंत पवित्र आणि लहान असला तरी स्वच्छ असतो. त्याप्रमाणे, आपला जन्म वासनेत झाला असला तरी सुरुवातीला मूळ स्वरूप निर्मळ असते. याच वेळी आई लहान मुलाला शिकवते, ' देवा चांगली बुद्धी दे, ' पुढे या निर्मळ मनावर निरनिराळ्या बऱ्यावाईट वासनांचे पगडे बसू लागतात. गंगेचे पाणी पुढे पुढे वाहात गेल्याने गढूळ होते. आणि ते स्वच्छ करण्यासाठी आपण ज्याप्रमाणे तुरटी लावतो, त्याप्रमाणे वासनेचा गढूळपणा घालविण्यासाठी 'राम कर्ता' ही भावना दृढ करायला पाहिजे. भगवंताच्या नामाची तुरटी फिरल्याने वासनेचा साका खाली राहून शुद्ध अंतःकरण प्रकट होईल. ' गेल्या जन्मात मी जी काही पापे केली असतील ती आता भोगतो आहे, ' असे नुसते म्हणून जगण्यात अर्थ नाही, कारण त्यामुळे आपण पुढच्या जन्माची तयारीच करीत असतो. जर पुढचा जन्म चुकवायचा असेल तर या जन्मीच त्यासाठी कार्य करायला पाहिजे; म्हणजे ती वासना नष्ट केली पाहिजे. सत्तावान्, श्रीमंत, वैभववान् माणसे सुखी असतात, हा नुसता भ्रम आहे. जोपर्यंत यांना भगवंताचा आधार नसतो तोपर्यंत या सर्व गोष्टी कुचकामाच्या आहेत. आपले प्रापंचिक सुख आहे ते दिसायला वरवर बाळसेदार दिसते, परंतु ती सूज आहे, हे काही खरे बाळसे नव्हे. म्हणून आपल्याला प्रपंचात सुख लागत नाही. आपले वय जसजसे वाढत जाते, तसतसे आपले व्याप वाढतात आणि परमेश्वराकडे दुर्लक्ष होते. वासना कमी होण्याऐवजी वाढत जाते, आणि तीच पुढल्या जन्माची अधिष्ठात्री ठरते. तेव्हा यातून काहीतरी मार्ग वेळेलाच काढणे आवश्यक आहे. हा मार्ग अगदी सरळ आणि सोपा आहे. संतांनी तो अनेक वेळा दाखवून दिला आहे. त्या मार्गाने पावले टाका, भगवंत पुढला मार्ग दाखवायला उत्सुक आहे. तुम्हाला हे सर्व पटले असे म्हणता, परंतु पटले असून करीत नाही. बरे, पटले नाही म्हणावे, तर का पटले नाही तेही सांगत नाही, याला काय करावे ? मनुष्याच्या ठिकाणी इतर प्राणीमात्रापेक्षा जर काही जास्त असेल तर ते म्हणजे चांगलेवाईट कळण्याची बुद्धी. तेव्हा तुमच्या बुद्धीला पटूनही जर तुम्ही तसे वागला नाही किंवा नुसता प्रयत्नही केला नाही, तर तो दोष सर्वस्वी तुमचाच नव्हे का ? म्हणून मला पुनः सांगावेसे वाटते की, वेळेलाच जागे होऊन योग्य रस्त्याला लागा. भगवंताच्या नामात राहून सर्व काय ते करा, हेच माझे शेवटचे सांगणे आहे.

## गहिनीनाथ



गर्भाद्रिपर्वतावर वामतीर्थी गोरक्षनाथ राहिला. त्यानें तेथेंच गहिनीनाथाकडून विद्याभ्यास करविला. एका वर्षांत तो सर्व विद्येंत निपुण झाला. नंतर त्यास मधुब्राह्मणांकडे पाठवून दिलें. पुढें त्या ठिकाणीं बहुत दिवसपर्यंत राहून शके दहाशें या वर्षीं त्यांनीं समाधि घेतल्या. कबरीच्या घाटाच्या समाधी बांधण्याचा मुख्य मुद्दा हाच होता की, पुढें यवनराजाकडून उपद्रव होऊ नये. एकदांऔरंगजेबबादशहाने ह्या समाधी कोणाच्या आहेत म्हणून विचारल्यावरून लोकांनीं त्यास सांगितले कीं, तुमच्या पूर्वजांच्या आहेत.



नवरात्र उत्सव म्हणजेच नवचैतन्य पान ६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, १४ ऑक्टोबर २०२३



कष्ट मेहनतीचा स्तर फळाच स्वरुप निर्धारित करत असतो पान ८


# आज आंतरवालीत तुफान

## घरी राहून न्याय मिळणार नाही : मनोज पाटील जरांगे

आधुनिक केसरी न्यूज



**अविनाश घोगरे**

**घनसावंगी :** अबंड तालुक्यातील १४ ऑक्टोंबर रोजी अंतरवाली सराटी येथे सकल मराठा समाजाचा भव्य दिव्य मराठा आरक्षणाविषयी मेळावा होणार असून याप्रसंगी बोलताना मनोज मनोज पाटील यांनी सांगितले की कितीही गर्दी असली तरी मराठा समाज घरी थांबणार नाही. तो कार्यक्रमाच्या ठिकाणी येणारच, घरी राहून न्याय मिळणार नाही त्यामुळे मेळाव्यासाठी सर्वांनी यायचे आहे, असे आवाहन मनोज जरांगे यांनी दि१३ पत्रकार परिषदेतून केले. अंतरवली सराटीमध्ये दि१४ रोजी १२ वाजता होणाऱ्या मराठा समाजाच्या मेळाव्याची सर्व व्यवस्था पूर्ण झालीय आहे. त्याठिकाणी ५ हजारांहून अधिक स्वयंसेवक सेवा देणार आहेत, अशी माहिती देखील जरांगे यांनी दिली.फक्त ३१ गावातील ग्रामस्थांनी केला खर्च आमच्या १२३ गावांनी राज्यातील संपूर्ण समाजाची सेवा करण्याचं ठरवलं आहे. आमचे पैसे घाम गाळून, पिकाच्या उत्पन्नातून आलेले आहेत. याव्यतिरिक्त कोणी 500 रुपये 123 गाव सोडून मागितले असतील तर दाखवून द्या. 123 पैकी फक्त 31 गावांतील ग्रामस्थांनी खर्च केला असून उर्वरित गावांतील पैशांची गरज पडली नाही.मनोज जरांगे पुढे बोलताना म्हणाले, सर्वांना विनंती आहे येताना डोक्यावर रुमाल, टोपी घालून यावं, सोबत पाण्याची बॉटल जेवणाचा डब्बा देखील घेऊन यावं. काही गैरसोय झाली तर नाराज होऊ नका. सर्वांनी वाहन हळू चालवावीत. संपूर्ण महाराष्ट्रातून बांधव येणार आहेत. गाडीला झेंडा, स्टिकर लावा आपली गाडी कुठेच अडवली जाणार नाही. सर्वांनी पोलिसांना सहकार्य करावे, शांततेत यायचं, शांततेत जायचं, अशी आवाहन देखील जरांगे यांनी केली.मेळाव्यासाठी येणाऱ्यांसाठी आजूबाजूच्या गावांनी पाण्याची जेवणाची सोय करावी. येणाऱ्यांनी गाड्यांमध्ये आजच इंधन भरून ठेवा, पंपावरील गर्दी टाळा. ही सभा शांततेत पार पडण्यासाठी सहकार्य करावे. सर्वजण शिस्तीचे पालन करतील, कोणीही आरडाओरड करायचा नाही. येथून पुढे मराठा समाजाला डाग लागू नये, आपल्या पायाखाली मुंगी सुद्धा मरु नये. मराठ्यांनी इतिहास रचलाय हा कार्यक्रम देखील ऐतिहासिक होईल, असा विश्वास जरांगे यांनी व्यक्त केला. मराठा समाजाने नेते मोठे केले ज्या घटनेच्या पदावर माणूस बसलेला आहे, यांच्याकडून मराठा द्वेष दिसतोय, मराठा समाजाने त्यानांही मोठं केलं, याची जाणीव त्यांनी ठेवावी, त्यांची भाषाच वेगळी ते येवल्याचे साहेब पण तसेच. धनगर बांधवांना देखील फसवलं त्यांना 50 दिवस दिलेत. आम्ही दोघे मराठा आणि धनगर एक आल्यावर सरकारचे कसे होईल. आम्ही दोघांनी मनावर घेतले तर तुम्ही काय करणार? मला धनगर समाजाचे आमंत्रण मिळाले असून मी जाईल.

**सभेसाठी मार्गावर ठिकठिकाणी राहणार मोफत अन्नदानासह चहा पिण्याच्या पाण्याचा महापूर**

:मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांची जाहीर सभा आज १४ ऑक्टोबर रोजी आंतरवाली सराटी ता.अंबड या ठिकाणी होत आहे. आपला आरक्षणाच्या हक्काच्या मागण्यासाठी मराठा समाजाचा आवाज सरकार पर्यंत पोहचवण्यासाठी प्रत्येकाने १४ तारखेच्या सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन आपल्या संवाद सभेतून मनोज जरांगे पाटील करत होते. या विराट सभेला लाखोच्या संख्येने समाज बांधव हे एकवटणार आहे,हा संदेश शहरापासून गाव खेड्यातील शेवटच्या माणसापर्यंत पोहचला आहे. समाजातील प्रत्येका पर्यंत संदेश पोहचवण्यासाठी युवकांनी सोशल मीडियासह पारंपरिक पद्धतीचा वापर करत मुळ पत्रिका अक्षदा देतांना पाहायला मिळत होते तालुक्यातील अनेक गावात मोठ्या प्रमाणात मूळपत्रिका तयार करून युवकांच्या माध्यमातुन मूळपत्रिका पाहुण्या पर्यंत पोहचवण्याचे काम करत होते. विशेषत: गावखेड्यात कायम शेतात राबणाऱ्या महिला पर्यंत अनेक विषय पोहचत नाहीत मात्र आरक्षणाचा हा विषय त्यांच्या पर्यंत पद्धतशीरपने पोहचवला जात होता. खेड्यापाड्यातील महिला आपली शेतातील कामे लवकर आटोपून १४ तारखेची तयारी करण्यात व्यस्त असल्याचे पाहायला मिळाले. तालुक्यातील अनेक गावात कित्येक दिवसापासुन मराठा आरक्षणासाठी साखळी उपोषण सुरू आहेत यात अनेक ठिकाणी महिलांची उपस्थिती आहे .सभेला जाण्यासाठी गावागावात नियोजन केले जात आहे .अनेक गावांनी पुढाकार घेत निधी उभा केला आहे. या निधीतून मोर्चाला जाणाऱ्या समाज बांधवांसाठी मोफत पुरी,ढेचा,खिचडी भाजी भाकरी या अन्नदानासह चहा,पिण्याचे पाणी. शीतपेय .लहान मुलांसाठी दुध उपलब्ध असणार आहे. मोठ्या प्रमाणावर वाहने सभेसाठी जाणार असल्याने या वाहनांमध्ये काही बिघाड झाल्यास समाजातील मेकॅनिक युवकांनी पुढाकार घेत वाहनांसाठी घनसावंगीच्या नजीक मोफत दूरूस्तीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे .घनसावंगी तालुक्यातून 1000 प्रशिक्षित तरुण स्वयंसेवक सभेच्या ठिकाणी सेवा देण्यासाठी उपलब्ध असणार आहेत.





## नवरात्रोत्सवाला होणार उद्यापासून सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील जागृत दैवतापैकी बाजार सावंगी येथील श्री रेणुका देवी भाविकांचे ग्रामदैवत व आराध्य दैवत आहे साडेतीन भक्ती पीठ असलेल्या माहूरगड वाशिनी रेणुका माता देवीचे हे उपपीठ असलेले राज्य शासनाच्या वतीने 'क'वर्गीय तीर्थस्थळ दर्जाचे घोषित आहे. या दैवताचा नवरात्र उत्सव रविवार (ता१५) घटस्थापनेने होणार असून मंगळवार (ता:२४) विजयादशमी पर्यंत चालेल उत्सवा दरम्यान विश्वस्त व उत्सव समितीतर्फे विविध कार्यक्रम घेतले जातात. रविवारी सकाळी घटस्थापना वस्त्र अलंकार अलंकार परिधान व आभूषणे चढवून उत्स वास प्रारंभ सप्तशती पाठ वाचन महाभिषेक महाआरती हरिपाठ रविवार (ता:२२) अष्टमीला होम हवन पूर्णा हुती बली पूजन मंगळवार ता(२४) विजयादशमीला विजयादशमी सिमो लंघन व व शमी पूजन होईल. येथील रेणुका देवीची मूर्ती प्रसन्न मुद्रा पूर्वाभिमुख सिंहावर आरुढ उजव्या हातात त्रिशूल तर डाव्या हातात सर्प रुपी आसुडाची धारणा असून राक्षसाच्या छातीवर पाय ठेवून भूत लात गाडणारी रुद्रावतार रुपी देवी मूर्ती आकर्षक आहे या देवतेची पूजा म्हणजेच जप उपासनेचा नवरात्र महोत्सव होय. सकाळ संध्याकाळ चौघडा डफ ढोल झांज वाजवून जागृत करण्याची रुढी होती ती आजही टिकून आहे. दररोज सकाळ संध्याकाळ भाविकांच्या उपस्थितीत महाआरती रात्री अनेक भजनी मंडळ व देवी भजनांचा कार्यक्रम आदिनाथ महाराजांचे कीर्तन हरिचंद्र राठोड यांचे निरंकारी सत्संग व प्रवचन तसेच भारुड व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नवरात्र महोत्सवाच्या कालावधीत मंदिर व प्रांगणा त आकर्षक विद्युत रोषणाई चमकी मंडपाची उभारणी दररोज परिसरातून भाविक दर्शनासाठी येतात विश्वस्त व पोलीस प्रशासन रांगा लावून गर्दीवर नियंत्रणाची जबाबदारी पार पाडतात ग्रामपंचायतच्या वतीने मूलभूत सुविधा व सहकार्य केले जाते. नव्याने अद्ययावत प्रवेशद्वाराची उभारणी केल्याने बाहेरच्या प्रांगणात नवरात्र उत्सवात पूजा तेल साहित्य विक्रीची दुकाने थाटली जाऊन अनेकांना रोजगार मिळत असतो.

## डॉ. अब्दूल कलाम...!

डॉ. अब्दूल कलाम यांनी
गरीबीला तोंड देऊन,
नावड्याचे काम केलीत
गावात पेपर वाटून.

भारताचे झाले महान
ते आकरावे राष्ट्रपती,
समाज कार्याची मशाल
घेतली कलामांनी हाती.

अग्नी, त्रिशूल नि पृथ्वीची
देऊन शस्त्र भारताला,
थोर वैज्ञानिक होऊन
गती दिली संरक्षणाला.

विज्ञानांशी जोडून नाते
दिनरात केले प्रयत्न,
महान कार्यातून झाले
कलाम, हे भारतरत्न.

जगात वैज्ञानिकांमध्ये
महान डॉ. अब्दुल कलाम,
आदर्श राष्ट्रपती झालेया
त्यांना असो माझा सलाम...!

– अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण, ९७६४३५०३७४.

## खुलताबाद तालुक्यात रब्बी पीक हंगामाची वाट बिकट

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यात यंदा गतवर्षाच्या सरासरीत पन्नास टक्के ही पाऊस न झाल्याने खरिपपिक हंगाम पिकांतील शेतमाल पाणी भरणा करण्यासाठी धावपळ सुरू असुन रब्बी पिक हंगामाची मात्र वाट बिकट असल्याचे चित्र आहे. गत वर्षांच्या तुलनेत यंदा सरासरीपेक्षा पन्नास टक्के पाऊस कमी झाला आहे. जेमतेम पावसावर खरिप पिके आलीत मात्र मका सोयाबीन बाजरी भुईमूग पिके मोठ्या मुश्किलीने आलीत यात मध्यांतरी पावसाने खंड दिल्याने पिकांना फटका बसला आहे. तर सध्या कापुस तुर पिकांना पावसाची (पाण्याची) गरज त्यासाठीं धावपळ सुरू झाली आहे. पावसाळा संपला रब्बी पिक हंगामाला सुरुवात झाली खरी मका बाजरी भुईमूग पिके काढलेल्या शेतात शेतकऱ्यांनी रब्बी पिक हंगाम पराची तयारी करुन ठेवली परंतु ना परतीचा पाऊस ना पावसाळ्याचा पाऊस अपेक्षित पाऊस न झाल्याने नदी नाले ओढे तलाव कोरडे ठाक पडून आहे. विहिरीनी तळ गाठलेले आहे. दुष्काळाचे ढगं गडद झाली आहे व पुढे रब्बी पिक हंगाम असताना वाट बिकट दिसून येत आहे. रब्बी पिका बरैबरच फळबागा जगविण्यासाठीही संघर्ष शेतकऱ्यांना करावे लागणार आहे. व या परिस्थितीत रब्बी पिक पेरणी होणार की नाही व कसी करणार असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. खरिप पिक हंगामाच्या उत्पन्नात मोठी घट झाली असून दुष्काळ सदृश्य परिस्थिती शेतकरी आहे. दुष्काळ संदर्भात सरकार शासन दरबारी मध्यांतरी हालचाली सुरू झाल्या परंतु शेवटी शेवटी तीन चार मोठे पाऊस झाल्याने त्याहालचाली ही बंद झाल्याने शेतकरी आज उद्या दुष्काळ जाहीर होईल अशा प्रतीक्षेत असताना प्रशासन व सरकार शेतकऱ्यांकडे लक्ष देण्यास तयार नाही. जेव्हा की तालुका व गावांचे पैसेवारी आणेवारी ४५-४८ पर्यंत आली आहे.परंतु दुष्काळ जाहीर होत नसल्याने शेतकरी संभ्रमीत आहे. खरिप बरोबरच आता रब्बी पिक हंगाम ही येत नसल्याने शेतकरी मेटाकुटीला आला आहे व परेशान झाला आहे. खुलताबाद तालुका दुष्काळी जाहीर करावा जेणेकरून शेतकऱ्यांना विविध योजना व सुविधा चा फायदा होईल, अशी मागणी शेतकरी नागरिकांतून होत आहे.


प्रवेश देणे चालू आहे.

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल,मुंबई
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ,मुंबई मान्यता प्राप्त व संलग्नित
गीताई सेवाभावी शिक्षण संस्था संचलित

समर्थ GNM नर्सिंग स्कूल
शंकुतला ANM नर्सिंग स्कूल

प्रवेश देणे चालू आहे.

| उपक्रमाचे नाव | प्रवेश क्षमता | कालावधी | पात्रता | वय |
|---|---|---|---|---|
| G N M | 40 | 3 वर्ष | 12 वी पास ( विज्ञान,कला,वाणिज्य) | 18 ते 34 वर्ष |
| A N M | 20 | 2 वर्ष | 12 वी पास ( विज्ञान,कला,वाणिज्य) | 18 ते 34 वर्ष |

वैशिष्ट्ये
› सुसज्ज इमारत
› तज्ञ प्राध्यापक वृंद
› मुलींसाठी स्वतंत्र हॉस्टेलची व्यवस्था
› नौकरीची 100% गॅरंटी
› प्रक्टिकलसाठी 100 खाटाच्या हॉस्पिटलशी संलग्न
› मागासवर्गीय मुलींसाठी स्कॉलरशीप लागु आहे.(SC,ST)

मोफत प्रवेश...!

नांदेड रोड, मुदखेड ता. मुदखेड जि.नांदेड

Mob. 8766028429, 9922036771, 9595614111

# आदित्य ठाकरेंचे आरोप

आधुनिक केसरी

माजी पर्यावरण मंत्री आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी मुंबई मेट्रोच्या कार डेपोच्या कामावरून आणि कंत्राटांवरून राज्य सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. आदित्य ठाकरे यांनी 'मातोश्री' या त्यांच्या निवासस्थानी पत्रकार परिषद घेतली. यावेळी आदित्य ठाकरे म्हणाले, आम्ही अनेक वर्ष मागणी केली की, मेट्रोचा कार डेपो आरे कॉलनीऐवजी कांजूरमार्गला न्या. आमच्या महाविकास आघाडी सरकारने तसा निर्णयही घेतला होता. परंतु, या लोकांनी आमचे सरकार पाडून सर्वात आधी मेट्रो कार डेपो कांजूरमधून पुन्हा आरेला नेण्याचा निर्णय घेतला. तसेच राज्यातल्या घटनाबाह्य सरकारने मेट्रोच्या चार वेगवेगळ्या लाईनसाठी चार वेगवेगळे कार डेपो बांधण्याचा, त्यासाठी चार वेगवेगळे कंत्राटदार नेमण्याचा घाट घातला आहे. यामध्ये राज्याचे १०,००० कोटी रुपयांचे नुकसान होत आहे. आदित्य ठाकरे म्हणाले, मेट्रो लाईन ६ च्या कार डेपोचे काम कांजूर मार्गमध्ये या वर्षापासून सुरू होत आहे. यासाठी दोन दिवसांपूर्वी ई-टेंडर नोटीस काढली आहे. कांजूरमार्गच्या जागेवर आम्ही इंटीग्रेटेड कार डेपो बांधणार होतो. तिथे मेट्रो लाईन ३, मेट्रो लाईन ६, मेट्रो लाईन ४, मेट्रो लाईन १४ या मुंबईतल्या दोन एमएमआरडीएअंतर्गत येणाऱ्या दोन लाईन्सचा कार डेपो बांधणार करणार होतो. परंतु, राज्यातल्या घटनाबाह्य सरकारने याच्या विपरीत निर्णय घेतला आहे. आदित्य ठाकरे म्हणाले, चार डेपो बांधायचे असतील तर त्यासाठी चार जागा घ्याव्या लागणार. त्याऐवजी इंटीग्रेटेड कार डेपो बांधला तर त्यात १० हजार कोटी रुपये वाचले असते. प्रत्येक कार डेपोसाठी दोन ते अडीच हजार कोटी रुपयांचा खर्च म्हणजेच चार कार डेपोंसाठी ९ ते १० हजार कोटी रुपये खर्च होणार आहेत. या डेपोंसाठी जागा विकत घेतली जाईल. ठाण्यात त्यासाठी आधीच कोणी जागा घेतल्या, त्याचा कोणाला फायदा मिळणार याच्या खोलात मी आत्ता जात नाही. परंतु, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या आजूबाजूच्या लोकांना यात रस आहे. ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे म्हणाले, इंटीग्रेटेड कार डेपो बांधला तर त्यात पैसे वाचले असते. राज्यातली चार कोटी जनता एका इंटीग्रेटेड डेपोद्वारे कनेक्ट झाली असती. प्रशासनावर पकड नसताना घटनाबाह्य मुख्यमंत्री काम करत आहेत. कोणाच्या तरी दबावाखाली काम करत आहेत. मित्र, कंत्राटदार आणि बांधकाम व्यावसायिकांच्या दबावाखाली असले निर्णय घेत आहेत. चार डेपोंसाठी चार जागा, चार कंत्राटदार, मग त्या चार डेपोंच्या सर्व्हिस आणि मेन्टेनन्ससाठी आणखी चार कंत्राटदारांना काम, असा सगळा प्रकार सुरू आहे. यामध्ये राज्याचं हित कोणीच पाहत नाही.

# हे तर सर्वच अनास्थेचे बळी

आधुनिक केसरी



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

**सध्या ओबिसीची जनगणना, मराठा बांधवांना ओबीसी मधुन आरक्षण, ओबिसींना राजकीय आरक्षण असे मुद्दे खुपच गाजत आहेत. ओबिसी नेमकं कोणाला म्हणायचे हा प्रश्न देखील घटना समीतीच्या सदस्यां समोर पडला होता. त्याच वेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी एस एसी एस टी प्रवर्गाप्रमाणेच अजून एक वर्ग आहे जो सामाजिक व शैक्षणिक मागासलेला आहे. आणि त्यांना विकासाच्या प्रवाहात आणणे आवश्यक आहे. असे स्पष्ट मत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले परंतु ओबिसी नावाला खुपच विरोध झाला. तरीही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी माघार घेतली नाही संविधानाच्या कलम क्रमांक तिनशे चाळीस मध्ये एस सी एस टी सोडून अजून एक मोठा समुह माघास आहे ते शोधुन त्यांना हक्क अधिकार द्यावे.**

आस्था, अनास्था व सेवा हे शब्द सर्व परिचित आहेत. कालपरत्वे त्यातील आस्था आणि सेवा ह्या मोठ्या प्रमाणावर लोप पावत आहेत. ज्या आहेत तेथेही काही राम उरलेला नाही. प्रत्येकजण आपली जबाबदारी झटकून वागतात त्यामूळे कुणाचा कुणालाही ताळमेळ लागत नाही. प्रत्येकजण स्वतःला काय मिळते व काय काय जास्तीचे मिळविता येईल यासाठी जीवाचे रान करतात. घरादारापासून समाजकारण व राजकारणात याचे प्रमाण अधिक वाढले आहे. राजकारण व समाजकारण करत असतांना हे सर्व मर्यादेबाहेर गेलेले आहे. म्हणून सत्ताधारी असोत वा विरोधक आपापल्या जबाबदाऱ्या व मर्यादा सोडून वागतात. समाज जीवनात वावरत असतांना आस्था आणि सेवा हे शब्द प्रत्यक्ष वागणूकीतून जवळपास हद्दपार होत आहेत. समाजा समाजात, माणसा-माणसात आपुलकी किंवा आस्था दिवसेंदिवस कमी होऊन सामाजिक सौख्याचे पतन होत आहे. हे वर्तमान परिस्थितीचे वास्तव चित्र आहे. अशा उद्वेगी व उपद्व्यापी अवस्था आणि व्यवस्थेतूनच नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालयापासून महाराष्ट्रातील सर्वच शासकीय आरोग्य व्यवस्थेचे विकृत व विद्रूप दर्शन होऊन शासकीय सेवेचे धिंडवडे पहावयास मिळाले. तमाम महाराष्ट्रीय गोर-गरिब जनतेसह मध्यम-निन्ममध्यम वर्गीय समाजाची अवस्था अतिशय बिकट झालेली आहे. पुर्वी शासकीय खात्यात कर्मचाऱ्यांची सेवाशर्तीची कामे करण्यासाठी आस्थापना विभाग असे, त्याचे नांव बदलून तेथे वर्तमानात सेवा हा शब्द वापरात आला. शासकीय सेवेतील अस्थापना विभागात थोड्या बहूत प्रमाणात कर्मचाऱ्यांची कामे करत असतांना आस्था असायची आता तर तीही पुर्णतः विरलेली दिसते. तत्पश्चात सेवा ही सेवा न राहता त्यालाही आमच्या सर्व बांधवांनी व्यवसायीकतेचे स्वरूप प्राप्त करून दिले आहे. म्हणजे कर्मचाऱ्यांनी कर्मचाऱ्यांच्या आस्था किंवा सेवेचा बट्याबोळ केला असे म्हणणे वागवे होणार नाही. असे प्रभावाने का घडते, येथे आपलीच माणसे आपलीच कामे करतांना मना-मनात कशा विकृती निर्माण करून छळतात. अशा स्वभाव गुणधर्माला आळा घालण्यासाठी वरिष्ठ स्तरावर बऱ्याच उपाययोजना असतात पण केवळ वरिष्ठांचे दुर्लक्ष व वेळ काढूपणाचे धोरण, अभ्यासाचा अभाव व जाणिवपुर्वक होत गेलेले अज्ञान, शिवाय कंट्रोल ऑफ पावर ही सर्वच कारणे जबाबदार आहेत. म्हणून नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण, वैद्यकीय महाविद्यालयासह पूर्ण महाराष्ट्रातील आरोग्य सेवेचा बट्याबोळ झालेला दिसतो.

प्राप्त परिस्थीतीत सर्वच राजकीय पक्षांचे पुढारी हे नांदेड येथे घडलेल्या घटनेवर त्वरेने उपाययोजना करून रुग्णसेवा व व्यवस्था सक्षम कशी करता येईल याकडे बारकाईने लक्ष न देता घडलेल्या घटनेवर उलटसूटल चर्चा करून, फोटो सेशन करून एकमेकांना दोषी ठरवून चिखलफेक करत विषयाचे गांभिर्य प्रामाणिक व संवेदनशिलतेने न घेता घडलेला प्रकार आणखीन जास्तच चघळून चघळून चिघळून ठेवत आहेत. यावरून असे सिद्ध होते की, या सर्व मंडळींना सर्वसामान्य जनतेविषयी व त्यांच्या सुख-दुःखा विषयी कसलेच देणे-घेणे नसुन आपणच कसे श्रेष्ठ आहोत हे सिद्ध करण्याचा बालिश प्रयत्न वाटतो. प्रिय वाचकहो अशा घटना वावंवार घडण्यास शासन प्रशासनासह हे सर्वच जबाबदार आहेत हे वास्तव नाकारून चालणार नाही. स्व.डॉ. शंकरराव चव्हाण हे एक दूरदृष्टे नेते होते म्हणूनच त्यांनी भविष्याचा विचार करून सर्वसामान्यच्या जनकल्याणासाठी वैद्यकीय सेवेसह सिंचन व इतर प्रकल्प सोई सुविधांची उभारणी करून जनहित साध्य केले. सर्वच स्तरावर त्यांच्या विचारांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही हे आपले दुर्भाग्य. वर्तमान महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणवणारे त्यांचे सुपूत्र, त्यांचा पक्ष अशा प्रकल्प स्थापनेपासून अधून मधून लोकप्रतिनिधी, मुख्यमंत्री ते मंत्री पदापर्यंत सत्तेत कार्यरत असून देखील त्यांच्या वडीलांनी उभारलेल्या अशा प्रकल्पाची दुरावस्था होऊन जनसामान्यांला नाहक त्रास होत आहे. याचे कधी प्रामाणिक निरिक्षण व आत्मपरिक्षण केले काय ? हा मोठा गंभिर प्रश्न आहे. आपल्या वडीलांच्या नावे असणारे अशा मोठ्या प्रकल्पांचे अडचणी जाणून घेवून त्या सोडविण्यास्तव या सर्वच मंडळींनी कितीवेळा काय काय ठोस उपाय योजना आमलात आणल्या हे ही प्रामाणिकपणे विचाराजोगे आहे. आपण सत्ताधारी असो अथवा नसो पण हे सर्वच सु व्यवस्थीत चालते का नाही याचे कधी निरिक्षण केले किंवा नाही हे तेच जाणोत. सर्व कांही झाले गेले व होऊन गेल्यावर हि सर्व मंडळी वेगवेगळ्या प्रसिद्धीमाध्यमांद्वारे मै बडा की तू बडा म्हणून मांड्या थोपटत आहेत. एका अर्थाने यांचेही बरोबर आहे म्हणा, कारण येणारा भविष्यकाळ हा निवडणूकीचा काळ असून आपली खरी ओळख पटविणारा आहे. असो, जे घडायला नको होते ते नांदेडसह संबंध महाराष्ट्राच्या वैद्यकीय व इतर सेवेबाबत होत आहे. याला खऱ्या अर्थाने आस्था किंवा सेवा या प्रमाणिक भावनेतून आणि संवेदनशीलतेने विचार केला तर मराठवाड्याच्या भाग्यविधात्यांनी त्यांचा हा गड व माजी मुख्यमंत्र्याचा बालेकिल्ला असून देखील नांदेड शहरवासीयांना स्वच्छ पाणी देण्यापासून हे इतर प्राथमिक मुलभूत सोई-सुविधांपासून कसे वंचित ठेवले आहे हे प्रत्यक्ष डोळ्यांनी आपण बघत आहोत. रस्ते, शिक्षण, उद्योगधंदे व इतर मुलभूत सोईसुविधां पुरवविण्यासाठी नांदेडकरांना कसे वेठीस धरल्या जाते आजही नांदेड शहराचा काय विकास या मंडळींनी केला हे स्पष्टपणे सांगावे. निवडणूका आल्या की तिच-तिच भाषणे, आश्वासने तोच पैशांचा बाजार अशा सर्व बेजबाबदार परिस्थीतीत कुठे कुणाला आणि कुणबद्दल आस्था राहणार. एकंदरीत वर्तमानातील सर्वच शासकीय - निमशासकीय यंत्रणेत



शासन-प्रशासनासह जनताही दोषी आहे. कारण जनतेने आपल्या लोकप्रतिधिची निवड करत असतांना लालसा व लालचेत अडकून मतदान केलेले असते. या ठिकाणी प्रामाणिक व सद्सदविवेकाने मतदान होत नाही. वर्तमानात सर्वच राजकीय पक्षाचे पुढारी  ठरलेल्या दरानुसार लोकप्रतिनिधीची निवड होते. मग आपण जर पैसे घेऊन मतदान करत असू तर अशा मंडळींकडून चांगल्या व प्रामाणिक सेवेची अपेक्षा कशी करता येईल ? थोडक्यात जसे पेरले तसेच उगवणार ना ! एक छोटेखाणी उदाहरण मी सांगू इच्छितो त्याचा सर्वांनीच अंर्तरमनाने व गांभिर्याने विचार होणे गरजेचे वाटते. नांदेड महापालिकेत मागच्या २५ वर्षापासून एकहाती काँग्रेसची सत्ता आहे. प्रत्येकजण मनमानी पध्दतीने वागणूक करत असून फक्त आस्था व सेवेचा बाजार मांडला आहे. जो तो आपापल्यापरीने बोली लावून राजकारण करतो. जनसामान्यांच्या सुखसोई व कल्याणाचे त्यांना कुठलेही सोयरसूतक नाही. भविष्यात या सर्व यंत्रणेला मतपेटीच्या माध्यमातून किंवा वेळप्रसंगी रस्त्यावर उतरून जाब विचारला पाहिजे तरच हे सर्व थोडे बहूत ताळ्यारवर येतील. अन्यथा भुकंपासारखे सर्वसामान्यांचे हाल होतील. म्हणून मला म्हणावेसे वाटते आज सर्वत्र जे कांही वास्तव चित्र उभे आहे. ते सर्व अनास्थेचे बळी म्हणावयास हरकत नाही. जमाना जालिमौंका है साहब, जरा संभलकर चलना । यहाँ लोग सिनेसे लगाकर, दिल निकाल लेते है ।।

# महामुकाबला

आधुनिक केसरी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

**दर चार वर्षांनी होणारी  एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा यंदा भारतात खेळवली जात आहे. ही तेरावी एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा असून प्रत्येक संघाचे साधारणपणे दोन सामने झाले आहेत. भारताचेही दोन सामने झाले असून भारताने आपले दोन्ही सामने लिलिया जिंकले आहेत. या वर्षीची विश्वचषक स्पर्धा ही रॉबिन राऊंड पद्धतीने होणार आहे म्हणजेच स्पर्धेत सहभागी सर्व संघ एकमेकांविरुद्ध लढणार आहेत आणि त्यातील सर्वोत्तम चार संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील यावेळी भारतीय संघ हॉट फेवरेट मानला जात आहे. अनेक दिग्गज माजी खेळाडूंनी भारतच विश्वविजेता ठरेल असा विश्वास व्यक्त केला आहे.**

अर्थात खेळाडू विश्वविजयाचा विचार करत नाही. ते एका वेळी एका सामन्याचा विचार करतात म्हणूनच त्यांच्या चेहऱ्यावर कोणताही दबाव दिसत नाही उलट ते खेळाचा आनंद लुटत आहेत. पहिले दोन सामने जिंकून भारताने सुरवात चांगली केली मात्र  भारताचा खरा कस आज लागणार आहे कारण आज स्पर्धेतील सर्वात हाय व्होल्टेज सामना आहे म्हणूनच या सामन्याला महामुकाबला असे म्हंटले जात आहे. ज्या सामन्याची वाट केवळ भारतातीलच नाही तर जगातील कोट्यवधी क्रिकेट रसिक आतुरतेने पाहत असतात तो भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना आज होत आहे. भारत पाकिस्तान सामना म्हणजे अक्षरशः थरार असतो. हा थरार आपण नुकत्याच झालेल्या आशिया कप स्पर्धेत पाहिला. आज त्याची पुनरावृत्ती होते की सामना एकतर्फी होतो हे अवघ्या काही तासात समजेल मात्र हा सामना रोमहर्षक होईल असाच सर्वांचा होरा आहे कारण दोन्ही संघ चांगल्या फॉर्मात आहे. भारताप्रमाणेच पाकिस्ताननेही आपले पहिले दोन्ही सामने जिंकले आहे. भारताप्रमाणेच पाकिस्तानचे फलंदाजही फॉर्मात आहेत. पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम हा जगातील सर्वोत्तम फलंदाजांपैकी एक असून तो चांगल्या फॉर्मात आहे. त्यांचा दुसरा फलंदाज मोहंमद रिझवान याने श्रीलंके विरुद्ध शतक झळकावले आहे. तसेच त्यांचे सलामीचे आणि मधल्या फळीचे फलंदाजही लयीत आले आहे. भारताचे तर सर्वच फलंदाज फॉर्मात आहे. त्यामुळे फलंदाजीत दोन्ही संघ बरोबरीत आहेत. गोलंदाजीत मात्र भारतीय संघ पुढे आहे भारताचे वेगवान तसेच फिरकी गोलंदाज सर्वोत्तम कामगिरी करत आहेत. या उलट पाकिस्तानी गोलंदाजांची लय बिघडली आहे. त्यांच्या शाहीन शहा आफ्रिदीने फॉर्म गमावला आहे. असद रौफ आणि हसन हे देखील लयीत नाहीत. त्यांचा फिरकी मारा साधारण आहे. त्यांचे क्षेत्ररक्षणही सुमार आहे त्यामुळे भारतीय संघ वरचढ दिसत आहे मात्र खेळात कधी काय होईल हे सांगता येत नाही त्यामुळे भारतीय खेळाडूंनी दक्ष राहायला हवे. एक मात्र खरे की भारतीय संघातील सर्व खेळाडूंनी आपली सर्वोत्तम कामगिरी केली तर हा सामना भारत सहज जिंकेल. भारताने हा सामना जिंकला तर एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत भारताचा  हा पाकिस्तान विरुद्धचा सलग आठवा विजय असेल आणि एकदिवस विश्वचषकात पाकिस्तान विरुद्ध पराभूत न होण्याची परंपरा कायम राहील. भारतीय संघाला या महामुकाबल्यासाठी मनापासून शुभेच्छा!




हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९


Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# फुलंब्री तालुक्यात ताप, सर्दी, खोकल्याबरोबर मुन्नाभाईही वाढले

## शासकीय रुग्णालयात औषध तुटवडा : खासगीत लूट सुरु

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र वडोद बाजार, बाबरा, आळंद, गणोरी केंद्रा अंतर्गत अनेक गावात डेंगीचे साथ सुरु होती. आता ती कमी झाली आहे. आता सर्दी, खोकला, तापेचे रुग्णांची संख्या वाढली आहे. तसीच अनेक मुन्नाभाई यांची प्रॅक्टीस जोमात सुरू आहे मात्र सर्वसामान्य रुग्णाची आर्थिक लुट सुरु असून आरोग्य विभाग निद्रास्त आहे. फुलंब्री तालुक्यातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रात व आरोग्य उपकेंद्रात रुग्णांना हवी ती औषधी मिळत नसून तुटवडा असल्याचे सांगितले जाते त्याच मुळे खाजगी डॉक्टरांना एक प्रकारे कुरणच तयाद झाले आहे. सर्दी खोकला ताप ह्या रुग्णाची संख्या २० टक्क्याने वाढली आहे. म्हणजे दहा रुग्णांपैकी ८ रुग्णांना हे हा संसर्ग दिसत आहे. यामुळे काळजी घेणे गरजेचे आहे. असाच त्रास ज्येष्ठांनाही होतो. यामुळे जेव्हा त्रास सुरु झाल्यानंतर तात्काळ वैद्यकीय सेवा मिळावी ही सर्वांची माफक इच्छा असते . स्वतः मनाने कोणतेही औषधे घेऊ न घेता डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधी घ्यावी लागत आहे . त्यामुळे औषध ही खाजगी व डॉक्टर ही खाजगीच मिळतात. घरातील एक जण आजारी पडल्यानंतर कुटुंबातील इतरही सदस्य आजारी पडू शकतात. काहींना यामुळे काळजी घेण्याचे आवाहन डॉक्टारांनी करत आहे. कोरडा खोकला येतो. नंतर ओला खोकला येतो. यानंतर श्वसनाचा त्रास होतो. या व्हायरलमध्ये तीन ते चार दिवस ताप असतो. त्यानंतर डोके दुखते, यात सुरुवातीला बदलत्या जीवनशैलीत आरोग्याचे अनेक प्रश्नही बदलत चालले आहे. ऋतू बदलाच्या काळात सर्दी, खोकला, तापेचा संसर्ग वाढतो. गेल्या काही दिवसापासून वडोद बाजार , पिरबावडा बाब्रा आळंद गणोरी सह फुलंब्री परिसरातील गावात सर्दी, खोकल्याचे रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. डेंगीचे रुग्णसंख्या कमी झाल्यानंतर ही संख्या वाढली असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. यामुळे या व्हायरलमध्ये काळजी घ्या आणि निरोगी रहा असा सल्ला डॉक्टरांतर्फे देण्यात येत आहे. गेल्या काही दिवसापासून ते वयोवृध्दापर्यंत सर्वांनाच घटक सर्दी खोकला, तापाने त्रस्त असून पिरबावडा, बाबरा, वडोद बाजार, आळंद येथे शासकिय दवाखान्यात औषधी तुटवडा भासत असल्याने गरजे पोटी रुग्ण खाजगी छोटे- मोठे दवाखान्यात गर्दी करत असून या ठिकाणी मुन्ना भाई डॉक्टर लँब चा रिपोर्ट काढायचे सांगुन व सलाईन लाऊन रुग्णाची सर्रास अर्थिक लुट करत आहे. तालुक्यात एकूण वैध व अवैध डॉक्टर कोण ? हे सर्व सामान्यांना कळणे अवघड झाले आहे. जिल्हा परिषदेचे आरोग्य विभाग या मुन्नाभाई यांच्या विरुद्ध कार्यवाही मोहीम राबविण्यात अयशस्वी ठरत असल्याने बोगस दवाखाने व मुन्नाभाई यांचा तालुक्यात सुळसुळाट वाढला आहे. सर्वसामान्य रुग्णाची लुट थांबवण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी व प्रा आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी यांनी निद्रानाश करून कार्यवाही करावी अशी मागणी गोर - गरीब रुग्णांकडून करण्यात येत आहे.






# श्रीगुरुदेव सक्रिय प्रचारक तथा ज्येष्ठ सेवकांचा भावपूर्ण सत्कार

## राजुरा येथे 'झाला नाही संत असा' विषयावर व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** श्रीगुरुदेव सेवा मंडळ सहकारनगर रामपूरचे वतीने ज्येष्ठ उपासक अनिल चौधरी यांनी आपल्या मातृपितृच्या स्मृतिप्रीत्यर्थ संत गजानन महाराज मंदिर परिसरात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रसंत साहित्याचे अभ्यासक ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर यांनी 'झाला नाही संत असा' या विषयावरील व्याख्यानाचे पुष्प गुंफले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय प्रचार समितीचे सदस्य ॲड.राजेंद्र जेनेकर, नशाबंदी मंडळाचे संघटक संदीप कटकुरवार, अभय घटे, ह.भ.प. आवारी आदींची उपस्थिती होती . अध्यक्षस्थानी डॉ.जगदीश शिंदे होते. ग्रामगीताकार राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी दुर्लक्षित, उपेक्षित, श्रमिक जनांचे वास्तववादी साहित्य निर्माण करून त्यांच्या उत्थानासाठीही विचार दिला.ते १९४२ च्या चिमूर क्रांतीचे सेनानी होते तसे निजामशाहीच्या रझाकारांचे राज्य उलथून टाकण्यासाठीही गावोगावी मोठ्या प्रमाणात जनजागृती केली होती.एकंदरीत राष्ट्रसंतानी वैश्विक मानवतेचे मुल्यदर्शन आपल्या साहित्यातून प्रभावीपणे घडविले असे ते म्हणाले. श्रीगुरुदेव श्रमश्री पुरस्काराचे मानकरी अनिल चौधरी यांच्या षष्ठी निमित्ताने सक्रिय श्रीगुरुदेव प्रचारकांचा सत्कार, वयोवृध्द महिलांचा सन्मान, ध्यानप्रार्थनेवर रामप्रसाद बुटले यांचे मार्गदर्शन, परशुराम साळवे यांचे ग्रामगीता वाचन आदी कार्यक्रम घेण्यात आले. आरोग्यविषयक मार्गदर्शन कार्यक्रमात उतार वयात होणारे आजार आणि घ्यावयाची काळजी व उपचार यावर वैद्यकीय अधिकारी डॉ.सुवर्णा गेडाम यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ.पल्लवी सानप, सतीश कौरासे,सुनीता कुंभारे यांची उपस्थिती होती ,कार्यक्रमाचे अध्यक्ष गजानन बोढे होते. सुत्रसंचालन देविदास वांढरे यांनी केले. व्याख्यानमालेतील पाहुण्यांचा परिचय व मानपत्र वाचन सौ.अश्विनी वांढरे हिने केले. सूत्रसंचालन प्रकाश उरकुंडे तर अनिल चौधरी यांनी आभार प्रदर्शन केले. सायंकाळी सामुदायिक प्रार्थनेच्या महत्वावर बाळा गोहोकर यांनी मार्गदर्शन केले. षष्ठी निमित्ताने श्रीगुरुदेवसेवक अनिल चौधरी यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला,सत्कार सोहळ्याच्या आयोजनात सौ.अरुणा चौधरी, रोहन चौधरी,अंकिता चौधरी व श्रीगुरुदेव सेवकांनी विशेष परिश्रम घेतले. राष्ट्रवंदना गायनाने समारोप झाला.

# मतदार नोंदणी प्रक्रिया २०२३ कँप

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आज दि. १३/१०/२०२३ ला मतदार नोंदणी प्रक्रिया २०२३ हा कॅम्प सिपेट सभागृहात घेण्यात आला. या कार्यक्रमाला प्राचार्य ऱवी मेहंदळे, गटनिदेशक टोंगे, झाडे मॅडम, बोढेकर, अजय साखरकर, गराड, घटे सर मार्तीवार सर व प्रशीक्षणार्थी हजर होते. यावेळी विद्यार्थ्यांना मतदार यादीत नाव नोंदणीसाठी आवाहन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाद्वारे नव मतदार जागृतीसाठी अभियान सुरू करण्यात आले आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून या कार्यक्रमाच आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात मतदार यादीत नाव नोंदणी करीता आवश्यक त्या सर्व महत्त्वपूर्ण बाबी विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आल्या. अजय साखरकर यांनी याबाबत संपूर्ण माहीत देत विद्यार्थ्यांना मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठी आवाहन करण्यात आले.



हिवराळे क्लिनिक अॅण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी) • त्वचा व गुप्त रोग • वजन वाढविणे
• आम वात उदर रोग • स्त्रीयांचे आजार • वजन कमी करणे
• दमा व ॲलर्जी (जुनाट) • स्थूलपणा, मूळव्याध • केसांच्या सर्व तक्रारी
• चिकन गुनिया • वंध्यत्व, संतती प्राप्ती • लहान मुलांची
• मनोकयीईक आजार • कॅन्सर सल्ला, मुतखडा • स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

महाराष्ट्र Business Katta

तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna
8623904312
Abhijeet Shukla
9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

अर्जंट पाहिजेत
बँक ऑफिससाठी महिला (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक), अनुभवी सुपरवायजर, मार्केटिंग प्रतिनीधी (स्वत:ची टू-व्हीलर आवश्यक) आणि अनुभवी सेक्युरिटी गार्ड पाहिजे.
संपर्क - 9822982958

CAFÉ ROCKSTARZ EAT. CHILL. REPEAT
11:11 ELEVEN ELEVEN
Where Dishes come True..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928

# नवरात्रोत्सव म्हणजेच नवचैतन्य



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**मॉंदेवी हे मांगल्य, चैतन्य, उर्जेचे व शक्तीचे प्रतीक आहे.अनेक कठीण प्रसंगी देवीची आराधना केली जाते.कारण मॉ दुर्गेचे दुसरे रूप म्हणजे संपूर्ण ब्रम्हांडच म्हणावे लागेल.घटस्थापणेपासुन तर दसऱ्यापर्यंत संपूर्ण भारतात आपल्याला वेगवेगळ्या पध्दतीचे उत्सहाचे व मांगल्याचे वातावरण पहायला मिळते.मॉ दुर्गाची शक्ती अफाट व अनंतकाल आहे. त्याची आपण गणना सुध्दा करू शकत नाही. त्यामुळे संपूर्ण शुभ कार्याप्रसंगी व कठीण प्रसंगी देवीची आराधना केली जाते. देवीचे अनेक रूप आपल्याला पहायला मिळते. प्राचीन काळापासून शक्तीच्या उपासनेला खूपच महत्व दिले गेले आहे. शक्तीची उपासना मानवजातीच्या कल्याणासाठी नेहमी प्रेरणादायी ठरत असते.**

नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने आपल्याला वेगवेगळी शक्तीची रूपे पहायला मिळते. म्हणजे नवरात्रीमध्ये पृथ्वीतलावर साक्षात देवी प्रगट होत असते.या पृथ्वीतलावर देवी भागवत पुराणानुसार देवींची 108 शक्तीपीठ असल्याचे सांगण्यात येते. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या पुराणांमध्ये ही आकडेवारी वेगवेगळी सांगीतली आहे.कालिका पुराणांमध्ये 26 , शिवचरित्र पुराणामध्ये 51,दुर्गा शप्तसती आणि तंत्रचूडामणिमध्ये शक्ती पीठांची संख्या 52 सांगितली आहे.परंतु साधारणतः 52 शक्तीपीठांना जास्त महत्व दिले जाते.या शक्ती पीठांपैकी साडेतीन शक्तिपीठे एकट्या महाराष्ट्रात आहे हे महाराष्ट्राचे अहोभाग्यच म्हणावे लागेल.देवीची साडेतीन शक्तिपीठामध्ये श्री महालक्ष्मी( अंबाबाईचे देऊळ,कोल्हापूर ) हे महाराष्ट्रात असलेल्या साडेतीन शक्तिपीठांपैकी एक आहे.श्री रेणुकामाता (माहूर) माहूर हे देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी दुसरे असून येथील पीठाची देवता रेणुकामाता आहे.रेणुकादेवी तसेच दत्तात्रय आणि परशुराम यांची देखील प्राचीन मंदिरे माहूरगडावर पहायला मिळते.त्यामुळे साडेतीन शक्तिपीठांपैकी हे एक मूळ जागृत पीठ आहे. तुळजाभवानी (तुळजापूर) महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी तिसरे शक्तीपीठ आहे.श्री तुळजाभवानी देवीचे तुळजापूर क्षेत्र हे एक पूर्ण शक्तिपीठ आहे. ही देवी भगवती (भवानी) म्हणून प्रसिध्द आहे. महाराष्ट्रातील प्रेरणा शक्ती व स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची आराध्य दैवत अशी ही तुळजापूरची भवानीदेवी महाराष्ट्राची कुलस्वामिनी आहे. इतिहास व पुरातत्वदृष्ट्या हे मंदिर यादवकालीन मानले जाते.तर काहिंच्या मते हे 17 व्या किंवा 18 व्या शतकातील मानली जाते.व साडेतीन शक्तिपीठांपैकी अर्ध्या पीठाचे महत्त्वाचे स्थान म्हणजे सप्तशृंगी देवी (नाशिक) सप्तशृंगीदेवीला महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वतीचे ओंकार रूप समजण्यात येते. शुंभनिशुंभ व महिशासुर या पाशवी शक्तीच्या असुरांचा नाश केल्यावर तप-साधनेसाठी देवीने या गडावर वास्तव्य केले होते. सह्यांद्रीच्या या उंच कड्यास सात शिखरे आहेत. त्यावरूनच या स्थानाचे नाव सप्तशृंगगड असे पडले. नवरात्र उत्सवामध्ये संपूर्ण भारतात आपल्याला एक वेगळेच मांगल्याचे व नवचैतन्याचे वातावरण पहायला मिळते. कारण लहान-मोठे, आबालवृद्ध संपूर्ण मॉदेवीच्या आराधनेमध्ये तल्लीन असतात व जय माता दी चा जयघोष करीत असतात. त्यामुळे नवरात्रीपासुनच दिवाळीच्या सणाची चाहूल लागते आणि नवरात्रीपासुनच आपण घरांच्या सजावटीला सुरूवात करतो.नवरात्र



उत्सवामध्ये देवीची 9 दिवस आराधना केल्यानंतर दशमीला विजयादशमी (दसरा)उत्सव मोठ्या थाटात साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व म्हणजे असुरी शक्तीचा नाश व सत्याचा विजय मानलेल्या जाते. दशमीला प्रभुरामचंद्राने रावणाचा संहार करून असुरी शक्तीला संपवीले व विजय प्राप्त केली. त्यानिमित्यानेच विजयादशमी उत्सव साजरा केला जातो. आपण पहातो की नवरात्रीपासुन गुलाबी थंडीला सुरुवात होते.म्हणजे संपूर्ण सृष्टीचे वातावरण या 9 दिवसांमध्ये बदलल्याचे आपल्याला दिसून येते व सर्वत्र नवचैतन्य निर्माण होते.महाराष्ट्राला संतांची भूमी संबोधल्या जाते. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात अनेक देवीदेवतांचे वास्तव्य असल्याचे आपल्याला पहायला मिळते. त्यामुळे महाराष्ट्रातील संपूर्ण नागरिकांनी महाराष्ट्र दर्शन करून देवीदेवतांचे एकदा तरी दर्शन घेतले पाहिजे. नवरात्रामध्ये आपण मॉदेवीची आराधना करतोच यात दुमत नाही.परंतु निसर्गाला वाचविण्यासाठी देवीला साकडे सुध्दा घातले पाहिजे. कारण दिवसेंदिवस निसर्गाचे संतुलन डगमगल्याने हवामानात मोठ्या प्रमाणात बदल होत आहे.यामुळे पशुपक्षी, मानव, जीवजंतू यांचा जीव धोकादायक स्थितीमध्ये आल्याचे स्पष्ट दिसुन येते. कारण वाढते प्रदुषण, जंगल तोड यामुळे निसर्ग भयभीत झालेला आहे.याचेच प्रयचित्य पशुपक्षांना भोगावे लागत आहे. आज जंगल तोडीमुळे आणि वाढत्या प्रदूषणामुळे अनेक पशुपक्षी नामशेष झाल्याचे दिसून येते. उदाहरण द्यायचे झाले तर चित्ता असे अनेक पशुपक्षी आहेत की ते काही नामशेष झाले आहेत किंवा होण्याच्या मार्गावर आहेत.याकरिता नवरात्र उत्सव लक्षात घेता संपूर्ण भक्तांनी वृक्षलागवडीकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.फक्त फोटो शेषन पुरते वृक्षारोपण नसावे तर 9 दिवस वृक्षलागवडीची मोहीम युध्दपातळीवर राबवीली पाहिजे.यात सरकारचा, प्रशासनाचा, सामाजिक संस्थांचा सुध्दा सहभाग असायला हवा. यामुळे निसर्ग प्रफुल्लित होईलच मॉदेवी सुध्दा प्रसन्न होईल व आपणा सर्वांना भरपूर आर्शिवाद देईल.कारण वृक्षलागवडीमुळे स्थल, जल, वायु यांचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल. मॉ महालक्ष्मी, रेणुकामाता, तुळजाभवानी, सप्तशृंगी देवीला प्रार्थणा करतो की नवरात्रामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड होवो आकार-पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर -दक्षिण सर्वत्र सुख-शांती व मांगल्याचे वातावरण निर्माण झाले पाहिजे अशी देवीच्या चरणी प्रार्थना करतो. कारण नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होने काळाची गरज आहे.कारण वाढते प्रदुषण, जंगलतोड व दिवसेंदिवस ऑक्सिजनची मात्रा कमी होने. यामुळे मानव, पशुपक्षी, जीवजंतू व अन्य प्राणी यांचा सर्वांचा जीव धोक्यात आहे. याकरीता नवरात्र उत्सवाच्या पावनपर्वाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून संपूर्ण भारतवासीयांनी इतिहास घडवीने गरजेचे आहे.कारण मॉदेवी म्हणजे संपूर्ण ब्रम्हांड त्यामुळे आपल्याला वृक्षांच्या जळामुळात, पानात, फुलात, फळात आपल्याला देवीचे अवश्य दर्शन अवश्य होईल.

# लक्ष्याकडे दुर्लक्ष

आधुनिक केसरी

**वीज ही शेतीसाठी आवश्यक गरज बनली आहे. विजेशिवाय शेती किंवा सिंचन आता शक्य नाही. मौज, मनोरंजन, आणि अन्नधान्य पीकवणारे शेतकरी, समाजाचे उदरभरण करणारी शेती यात फरक करावाच लागेल. महाराष्ट्रातील एंशी टक्के रोजगार शेती आणि शेतीसी निगडीत उद्योग व व्यवसायावर अवलंबून आसतांना शेतीसाठी लागणाऱ्या आणि पायाभूत गरज आसणार्या विजेला धोरणकर्त्यांकडुन एवढे दुर्लक्षीत का ठेवले जाते हे न उलगडणारे कोडे आहे. पक्ष व सरकार कोणतेही आसो विजेच्या बाबतीत कमी अधिक सगळे सारखेच. भारनियमनाचे भुत शेतकऱ्यांच्या मानगुटीवरून पुढारलेल्या महाराष्ट्रात तीस वर्षांपासून उतरायला तयार नाही. भारनियमन तर आहेच पंरतु रोज येणार्या अडचणी वेगळयाच.**

कधीही विज जाणे, ट्रान्स्फॉर्मर जळणे, योग्य दाबाचा विज पुरवठा नसणे, केबल व तार जळुन पडणे, मुलांचे झोके बांधावे तसे तार लोंबकाळत असणे, लाईनमन नसने, फॉल्ट होणे, तांत्रिक दृष्टया सक्षम कर्मचारी नसने आशा शकडो अडचणीत आज विज म्हणजेच महावितरण आडकले आहे. ह्या सर्व बाबींचा फटका प्रत्यक्ष पणे राज्यातील शेतकऱ्यांना बसत आहे. कोरोनाच्या कठीण काळात सगळे उद्योग बंद आसतांना केवळ कृषी क्षेत्राने वाढ नोंदवली. पंतप्रधानापासुन अजित पवारांपर्यंत हे वास्तव सगळ्यांनी मान्य केले. मग शेतकऱ्यांना विज पुरवठा करतांना सावत्र पणाची वागणूक का, हा सतत मनाला भेडसावत आसलेला प्रश्न आहे. कृषिप्रधान राज्यात शेतीसाठी आठ तास विज दिली जाते. रात्री बेरात्री केंव्हाही व शेतकऱ्यांना विश्वासात न घेता टाईम ठरतो. आठ तासांत किमान चार पाच वेळ विज जाते आणि येते. विज नियमक आयोग कृषीपंपाच्या वीजे बाबत काय करतो कळत नाही. शेतकऱ्यांकडून वसुली मात्र पठाणी केली जात आहे. 1995-96 पर्यंत महाराष्ट्र देशातील इतर राज्यांना विज पुरवठा करायचे. विजेची टंचाई महाराष्ट्राला माहीत नव्हती. आमच्या राज्यात अतिरिक्त विज होती. 1994-95 ला कोकणातील विज निर्मीती प्रकल्प एनरॉन (दाभोळ पॉवर प्रोजेक्ट) चे वादळ उठले. प्रकल्प आरबी समुद्रात बुडवण्याच्या आणाभाका झाल्या, नंतर एनरॉन च्या प्रमुख रेबेका मार्क बाई आल्या स्व. बाळासाहेबांना भेटल्या आणि एकदाचा आरबी समुद्र बुजण्या वाचुन वाचला. पंरतु प्रकल्प रेगांळाला. विज टंचाई वाढत गेली.

त्यानंतर अनेकांनी घोषणा केल्या पण भारनियमन कमी झाले नाही. प्रयत्न झाले परंतु धोरण म्हणून शेतीसी निगडीत विज समस्यांकडे पाहलेच गेले नाही. फडणवीस सरकारने सोलाराचा चांगला पर्याय शेतकऱ्यांना दिला होता, पंरतु महाविकास अघाडी सरकारने त्या कडेही साफ



दुर्लक्ष केले. आता पुन्हा एकदा कधीनव्हे ते महा युतीचे सरकार आले पंरतु कृषीपंपा बाबत भुमीका स्पष्ट नाही. देशातील केंद्र सरकारकरची एक 'कुसुम' योजना चालु आहे. राज्यातील मात्र 31 मार्च 2018 पासुन आज पर्यत कोटेशन भरलेल्या सर्व शेतकर्यांची निविन विज जोडणीची कामे बंद आहेत. राज्य सरकारने सोलार योजना सुरू केली पंरतु भ्रष्टाचाराच्या विळख्यात आडकुन सोलार म्हणजे भीक नको कुत्रे आवर म्हणण्याची वेळ बोगस साहीत्या मुळे शेतकऱ्यांवर येत आहे . कृषीपंप आणि घरगुती थकीत वसुलीतुन कामे करा आसा आदेश काही दिवसांपूर्वी राज्य सरकारने काढला होता. पंरतु पायाभूत कामाच्या बाबतीत वसुली हा निकश लावता येणार नाही याचे भान राज्यकर्त्यांनी ठेवले पाहीजे. केंद्र सरकार देशभर लाखो कोटींचे रस्ते बांधत आहे. पीण्याचे पाणी, उद्योगाला लागणारे पाणी आणि शेती सिचंनासाठी मोठ मोठी धरणे बांधली जातात. इमारती, अरोग्य सुविधा उभ्या केल्या जातात. सुरक्षा आणि संरक्षण यावरही वारेमाप खर्च होतो. तेव्हा आपण वसुलीतुन हे सगळ का करत नाही आसा प्रश्न पडतो. आमची शेती आणि शेतकरी हा अन्नदाता आहे. देशातुन आज मोठ्याप्रमाणावर खाद्यान्न, मसाले, फळे, भाजीपाला निर्यात होतो. यातुन देशाच्या आणि राज्याच्या तिजोरीत परकिय चलन येते. अर्थव्यवस्था मजबूत होते.याचा विचार करून शेतीसाठी विज निर्मीती, विज वितरण व मेटन्स झाले पाहिजे. शेतीसाठी भायाभुत आणि आवश्यक आसणार्या विजेच्या बाबतीत राज्य सरकारचे दुर्लक्ष शेती क्षेत्राला व शेतकऱ्यांना गंभीर खाईत लोटत आहे.

याची जाण राज्यकर्ते आणि धोरणकर्त्यांना होणे गरजेचे आहे. किमान महाराष्ट्रातील शेती समोरील हे संकट टाळण्यासाठी 'लक्ष' म्हणुन काम करणे अपेक्षित आहे.

विष्णुपंत भुतेकर
9420708989

# ए.पी.जे. अब्दुल कलाम



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**अग्निपंख नावाचे आत्मचरित्र ए.पी.जे अब्दुल कलाम यांनी लिहिले असुन त्यांनी एकूण 24 पुस्तके लिहिलीत. त्यातील बहुतेक पुस्तके त्यांनी मुलांसाठी व शिक्षकांसाठी लिहिली आहेत. विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त वाचन करून स्वतःचे ज्ञान वाढवावे असा त्यांचा आग्रह होता. वाचनाने माणूस समृद्ध होतो असेही त्यांचे मत होते. लहान वयातच मुलांमध्ये वाचण्याची आवड निर्माण व्हायला हवी असे ते म्हणत. डॉं.ए.पी.जे.अ..कलाम यांना आदरांजली म्हणून १५ आक्टोबर हा दिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा केला जातो. मुलांना वाचनामध्ये गोडी निर्माण व्हावी, वाचनाचे महत्व समजावे ,शाळा-महाविद्यालयात विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची गोडी लागावी, ती निर्माण व्हावी हाच वाचक प्रेरणा दिनाचा उद्देश आहे.**

अभ्यास एक अभ्यास न रहाता अवांतर वाचनही आवश्यक आहे. त्याचे अनेक फायदेहि आहेत.अवांतर वाचनाने अनेक संदर्भ मिळतात.आकलनशक्ती वाढते.व्यक्तिगत विकास तर होतोच. राज्यातील प्राथमिक शाळा,माध्यमिक शाळा,महाविद्यालये, यातून हा मुख्यत्वे साजरा व्हावा ह्या उद्देशाने सरकारी पातळीवरूनही निर्देश दिले जातात.वाचन प्रेरणा दिनाचे निमित्ताने शाळा,महाविद्यालयात डाँ कलामांचे पुस्तकांच वाचन व्हावे. एक वाचन कट्टा त्यासाठी निर्माण व्हावा, त्यात सगळ्या विद्यार्थी आणि शिक्षकांचा सहभाग असावा.सामाजिक स्तरावरही ह्याचा प्रसार करुन,ह्या वाचन कट्ट्या साठी पुस्तके गोळा करावी.आणि शाळा शाळा,मध्ये पुस्तक पेढी तयार करावी.डाँ कलाम यांना आदरांजली म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यांने पुस्तक वाचण्याचा संकल्प करावा.शिक्षकांनीही कलामांचे पुस्तकांचे वाचन करावे. डाँ कलामांचे लेखन विद्यार्थ्यांन मध्ये सकारात्मक विचारदृष्टी,प्रेरणा देण्याची कार्य करतील, हा विचार या मागे आहे.स्वयंसेवी संस्था,शिक्षकांनी,माजी विद्य्यार्थ्यांनी,पालकांनी,शाळेतील ह्या वाचनकट्ट्याला एक पुस्तक किंवा शक्य तेवढी पुस्तके भेट द्यावीत. शाळां मधून विद्यार्थ्यांना एक तास मुक्त पणे वाचन करण्याचा आनंद मिळावा म्हणून ठेवावा.त्यांना त्या तासाला पुस्तके उपलब्ध करुन द्यावीत. पुस्तके प्रेरणा तर देतातच, पण महत्वाचे म्हणजे ते ज्ञानाचे स्त्रोत आहे.वाचनात अनेकविध गुण आहेत.शब्द संग्रह समृद्ध तर होतोच,पण ज्ञानाची कक्षाही रूंदावते. मनोरंजन हा भाग तर आहेच.शाळा शाळातून चांगल्या पुस्तकांचे चर्चासत्रांच आयोजन करणे,एखाद्या पुस्तकावर व्याख्यान, लेखक,कविना आमंत्रित करुन त्यांच्याशी विद्यार्थ्यांचा संवाद घडवून आणणे,मुलांना बोलत करणे. पुस्तकांच प्रदर्शन, अश्या प्रकारांनी कार्यक्रम केले जावेत. महानव्यक्तिंचे जीवनात वाचनाचा पडलेला प्रभाव ह्या विषयावरचे व्याखान ही आयोजीत केले जाऊ शकते. एखादे पुस्तकावर विद्यार्थ्यांन मध्येही चर्चा घडवून आणाली जावू शकते. इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे, इंटरनेटच्या मोह जाळामुळे वाचन कमी होतय का? आजची पिढी फेसबूक, व्हाट्सअप, इंस्टाग्राम, सोशल मीडियाच्या आहारी गेल्यामुळे वाचन संस्कृती हरवत चालली आहे. वाचन संस्कृती हरवत चालली आहे का? हा प्रश्न नेहमीच उपस्थित होतो. त्याच उत्तर काही अंशी होय असे आहे. फेसबूक व्हाट्सअप इंस्टाग्राम बंद पडलेतर काय परिस्थिती निर्माण होईल कल्पना करा. तर किती अस्वस्थता येईल कल्पना करा. आज ई बुक चे वाचन मुले करतात असा दावा केला जातो. पण तो काही खरा नाही.एक पाच दहा टक्के मुलेही ते वाचत नसावे.हातात पुस्तक घेऊन वाचण्याचा आनंद निराळाच असतो. हा एक दिवस साजरा करुन वर्षभर स्वस्थ बसणे,आणि पुढच्याच वर्षी परत एक दिवसाचा वाचन प्रेरणा दिन साजरा करणे हा उद्दिष्टे असू नये.केवळ शिक्षण विभागाचा फतवा येतो,म्हणूनचा उपचार नसावा.दरवर्षी कार्यक्रमाच्या बातम्या तर खूप वाचतो. शालेय मुलांच्यात वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून सातत्याने प्रयोग आणि प्रयत्नांची गरज आहे.डाँ.कलाम म्हणतात "विद्यार्थ्यांना घडवणा-या शिक्षका मध्ये ही उच्च गुणांची गरज आहे.तो ज्ञानाने संपन्न असावा.विद्यार्थ्यांशी आपुलकी असावी. जीवनाबद्दल सकारात्मक दृष्टिकोन असावा.केवळ पुस्तकी ज्ञान, शिक्षण देणे, एवढेच न करता मुलांची मने उच्च ध्येयाने प्रज्वलित केली पाहिजे. विद्यार्थ्यांना टी.व्ही.,स्मार्ट फोन, काँम्पुटर,यापासून काही काळ दूर करुन त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण करणे हाच या दिवस साजरा करण्या मागचा प्रमुख उद्देश आहे.

# सखोल विचारांचे 'निरभ्र' काव्य



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**मौनातही शब्दतरंग निर्माण करते ती कविता, जगण्याचे संदर्भ गडद करते ती कविता, वेदनांना, दुःखाला एक मोकळी वाट करून देते ती कविता. आपल्या आजुबाजुला विविध प्रकारचे अंधार दाटून आलेले आहेत.त्या अंधारात आपल्या प्रगल्भतेची प्रकाशमानता निर्माण करून विचारांची ज्योत पेटवण्याची सक्षमता कवितेमध्ये असते.उत्तम शब्दांची उत्तम रचना म्हणजे काव्य. व्यक्त होण्याचे हे माध्यम इतके खास आहे की, स्वतःची स्वतःला ओळख होत जाते.**

छोट्या - छोट्या शब्दरचनेतून गहन विचारधारा मांडणं त्यातही आपल्या नजरेतील प्रतिबिंब तंतोतंत काव्यात उतरणं तेथेच खरे कसब लागते.
लेखक आणि कथाकार व. पु. काळे म्हणतात, 'ध्यानीमनी नसताना विचारांच्या माध्यमातून जो तुम्हाला खडबडून जाग आणतो, तो कवीच असतो.' कवीच्या अस्तित्वाची इतकी नेमकी आणि खात्रीशीर ओळख व . पु. नी करून दिली आहे.

कवी अर्चिस जोशी आणि कविता हे समीकरण ही तसेच आहे. आपल्या मनाच्या गाभाऱ्यात निर्माण होणाऱ्या भावतरंगांना आपल्या प्रतिभेने आणि शब्दसुमनांनी सजवून रसिकांच्या समोर आणले आहे, आपल्या नव्याकोऱ्या काव्यसंग्रहाच्या स्वरूपात !

कवी अर्चिस जोशी रचित 'निरभ्र' हा काव्यसंग्रह जगण्यातील संदर्भमूल्य अधोरेखित करणारा आहे. मनोरेखित हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह , आणि आता 'निरभ्र' या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून जीवनातील अनेक चढ - उतार, विचारांची रचना आणि गती तसेच बदलता दृष्टिकोन , जगण्यातील एकाकी वृत्ती किंवा तशी वाढीस लागलेली भावना सोबतच प्रीतीचा हळूवार स्पर्श अशा मानवी मनाच्या केंद्रस्थानी असणाऱ्या घटकांना कवितेच्या प्रांगणात प्रकाशमान केले आहे. शारदा प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या 'निरभ्र' या काव्यसंग्रहात हिंदी आणि मराठी कविता समाविष्ट असून हिंदी विभागात ११ तसेच मराठी विभागात १६ कविता आहेत. हिंदी आणि मराठी भाषेचा फरक असला तरी व्यक्त होणारा भाव समान आहे. मुक्तछंदातील ह्या कविता अधिक उत्कट आणि प्रवाही आहेत. स्वच्छ, सुंदर आकाश जसे भासते निरभ्र, तसेच कवीचे अंतःकरण निर्मळ, नितल आणि पारदर्शक आहे. त्यामुळे कवितेत तीच निरभ्रता पसरली आहे. आणि म्हणूनच या काव्यसंग्रहाचे शीर्षक अगदी यथार्थ आहे.

कवितेच्या क्षमतेविषयी व. पु. म्हणतात, 'अति उत्कट असं काही असतं तेव्हा, कविताच ती उत्कटता पेलून धरु शकते, असं कायम वाटतं.' आणि ती उत्कटता कवी अर्चिस जोशी यांनी संयतपणे मांडली आहे, हे विशेष.

काव्यसंग्रहामधील मराठी विभागातील शीर्षक कवितेत कवी म्हणतो ,

**प्रारब्ध पालवी आकांक्षताना**
**कुजतात विषण्ण विषय वृत्ती**
**दिसले जरी धूसर मला हे**
**मी पाहतो ते निरभ्र !**


जीवनातील प्रत्येक घडामोडीकडे सकारात्मक आणि पारदर्शक नजरेने पाहिले पाहिजे. जरी ते धूसर असले म्हणजे आचार - विचारांची, वृत्तीची, भाव- अभावांची धुसरता असली तरी नितलपणे म्हणजेच डोळसपणे पाहण्याची मानसिकता व्यक्त करणारी ही कविता. ही स्पष्टता फक्त नजरेत नाही तर विचारांमध्ये सुद्धा यायला हवी, असेही कवी सांगत आहेत.

**'एक आई अन् एक तू,**
**भाव कोमल स्पर्श तू**
**व्यक्त मी तुझीया करांनी**
**शब्द मी तुझीया स्वरांनी**
**शक्ती मी, सामर्थ्य मी,**
**अभिमानाने कृतार्थ मी**
**नमतो तुझ्या चरणात मी**
**हे भव्य माझी माय मराठी !'**

आपल्या मातृभाषेविषयी प्रत्येकाला अभिमान आणि आदर असतोच. समस्त मातृभाषेविषयी प्रेमभाव जपणाऱ्या प्रत्येकाची भावना कवीने 'माय मराठी' कवितेतून व्यक्त केली आहे. आपल्या मातेसमान असणारी आपली मातृभाषा आणि तिचा प्रवास यात उलगडला आहे.

**'सुकून गेले भाव सारे**
**राहिले बस शुष्क श्वास**
**हरवले सर्व स्वतःपाशीचे**
**हाती राहिले फक्त आभास'**

संपूर्ण आयुष्यभर भौतिक सुखाच्या मागे धावणाऱ्या मनाला एका अंतिम सुखाची अभिलाषा




असते. पण नेमके समाधान कशात आहे, हे समजावून सांगणारी ही 'आभास' कविता आहे. 'मागे वळून' ही कविता संवेदनशील आहे कारण आपल्या निरागस बालपणीच्या सुंदर स्वप्नांची नक्षी यात रेखाटलेली आहे. तेच खरे जगणे होते, याची प्रचिती देणारी ही कविता आहे. हल्ली भोजन ग्रहण करण्याच्या पद्धतीत अनेक बदल झाले आहेत. आजकालच्या अद्ययावत जीवनशैलीमुळे टेबलवर बसून चमच्याने खाल्ले जाते. जमिनीवर बसून पारंपरिक पध्दतीने जेवण्याची संकल्पना कमी होत चालली आहे. आपली परंपरा , त्या कृतीमागील नेमका विचार यात तथ्य आहे आणि ही आपली परंपरा पुढील पिढीने जपली पाहिजे, हाच भाव मनात ठेवून कवीने 'कॉर्पोरेट लंच' ही कविता लिहून पुन्हा आपल्या पारंपरिक जेवणावळीची संकल्पना वाढावी, ही कामना व्यक्त केली आहे.
'क्षितिज', 'आशा', 'लम्हे', 'सारांश', 'लब्ज', 'नाम गुम जायेगा' अश्या हिंदी कवितेतील भाव आणि त्यातील गर्भितार्थ दिशादर्शक आहे. उर्दू शब्दांच्या एका विशिष्ट लहेजामुळे कविता वाचताना कविला अपेक्षित असलेला भाव वाचकांपर्यंत सहजपणे पोहचतो. तसेच प्रत्येक कवितेसोबत दिलेली रेखाचित्रे कवितेला एक चेहरा प्राप्त करून देतात. एकूणच काव्यवाचनात रमणाऱ्या प्रत्येकाला अंतर्मनातून साद घालणारा 'निरभ्र' हा कवितासंग्रह नक्की वाचा ! ( **निरभ्र - कवितासंग्रह / कवी अर्चिस जोशी / प्रकाशक : शारदा प्रकाशन / मूल्य :२०० रुपये** )

# चूक कोणाच्या हातून होत नाही ?

आधुनिक केसरी

**चूक कोणाच्या हातून होत नाही ? जो काम करील त्याच्या हातून चूक होऊ शकते आणि जो कामच करणार नाही त्याच्या हातून चूक होण्याचा प्रश्नच उदभवत नाही. माणूस लहान असो वा मोठा, प्रत्येकाकडून कधी ना कधी चूक ही होतेच. काही लोक आपली चूक मान्य करतात तर काही करीत नाहीत. काही लोक झालेल्या चुकीपासून बोध घेऊन जीवनात वाटचाल करतात. हिंदी चित्रपटसृष्टीतही अशीच एक घटना घडली होती. एक गाजलेला चित्रपट निर्मिती अवस्थेत असताना त्या चित्रपटाच्या निर्मात्या-दिग्दर्शकाने त्या चित्रपटातील एका लोकप्रिय गीताचे चित्रीकरण केले. या गीतात एका पार्श्वगायकाचा नव्हे तर दोन पार्श्वगायक आणि दोन पार्श्वगायिका असे चौघांचे आवाज होते.**

परंतु त्या गीताच्या चित्रीकरणाच्या वेळी दिग्दर्शकाने चारही आवाज चार वेगवेगळ्या व्यक्तिरेखांवर चित्रित करण्याऐवजी दोन आवाज एकाच व्यक्तिरेखेवर चित्रित केले. गीताचे संपूर्ण चित्रीकरण पार पडल्यावर दिग्दर्शकाने चित्रपटाच्या संगीत दिग्दर्शकाला चित्रित झालेल्या गीताची कच्ची प्रिंट दाखविली तेव्हा संगीतकाराने दिग्दर्शकाची चूक त्याच्या नजरेला आणून गीताचे फेरचित्रीकरण करण्यास सांगितले. परंतु दिग्दर्शकाने गीत पुन्हा चित्रित करण्यास असमर्थता दर्शविली. ते निर्माते-दिग्दर्शक म्हणजे प्रख्यात मेहबूब खान आणि संगीत दिग्दर्शक होते नौशाद अली ऊर्फ नौशाद !
१९०६ साली बडोद्याजवळच्या एका छोट्या गावात जन्मलेले रमजान खान ऊर्फ मेहबूब खान यांना दिग्दर्शक बनण्यापूर्वी अभिनेता बनायचे होते. काहीतरी बनण्याची इच्छा उराशी बाळगणारे मेहबूब खान वयाच्या सोळाव्या वर्षी घरातून पळून गेले; पण पोलिस दलात असणाऱ्या त्यांच्या वडिलांनी त्यांना पकडून घरी आणले. ते पुन्हा घरातून पळून जाऊ नयेत म्हणून जवळच्याच एका गावातील मुलीशी त्यांचे लहान वयातच जबरदस्तीने लग्न लावून दिले. वयाच्या तेविसाव्या वर्षी खिशात अवघे तीन रुपये असताना तीन मुलांचे पिता मेहबूब खान स्वप्ननगरी मुंबईत आले. मुंबईत आल्यावर इंपिरिअल कंपनीत त्यांनी जादा (एक्स्ट्रा) कलाकार म्हणून अनेक लहान-मोठ्या भूमिका केल्या. १९३१ साली अर्देशीर इराणी आपल्या `आलमआरा' या चित्रपटात मेहबूब खान यांना प्रमुख भूमिका देणार होते; पण ती भूमिका त्यांच्याऐवजी मास्टर विठ्ठल यांच्याकडे गेली. आपल्या चित्रपट कारकिर्दीतील पहिली मोठी संधी त्यांना १९३५ साली `अल हिलाल' या चित्रपटात मिळाली. १९४० साली मेहबूब खान यांनी `औरत' या चित्रपटाचे दिग्दर्शन केले. त्या चित्रपटात सरदार अख्तर यांनी प्रमुख भूमिका केली होती. कालांतराने अख्तर यांच्याशी मेहबूब खान यांनी दुसरा विवाह केला. १९४२ साली त्यांनी `मेहबूब प्रॉडक्शन' या चित्रपटनिर्मितीसंस्थेची स्थापना करून तिच्या झेंड्याखाली `रोटी' हा चित्रपट निर्माण केला. त्यानंतर त्यांनी `अंदाज' (१९४९), `आन' (१९५२), `अमर' (१९५४) असे उत्तमोत्तम चित्रपट निर्माण केले. १९५४ साली त्यांनी मुंबईच्या वांद्रे (पश्चिम) उपनगरात `मेहबूब स्टुडिओ' उभा केला. भारतीय चित्रपटांमधील मैलाचा दगड गणला गेलेला `मदर इंडिया' हा चित्रपट त्यांनी १९५७ साली निर्माण केला. हा चित्रपट त्यांच्याच `औरत' या चित्रपटावरून निर्माण केला गेला होता. `मदर इंडिया'मधे नरगिस, राज कुमार, सुनील दत्त, राजेंद्र कुमार, कुम कुम, कन्हय्या लाल आदी नामवंत कलावंत होते.

`मदर इंडिया' निर्मिती अवस्थेत असताना त्यातील गीतांवर काम सुरू होते. संगीत दिग्दर्शक नौशाद गीतांना प्रसंगोचित आणि श्रवणीय चाली लावण्यात मग्न होते. त्यात एक गीत होते "दुख भरे दिन बीते रे भय्या, अब सुख पायो रे, रंग जीवन में नया लायो रे..." नौशाद यांनी हे गीत चित्रपटातील प्रसंगानुरूप (सीन) मोहम्मद रफी, मन्ना डे, आशा भोसले



आणि शमशाद बेगम या चार पार्श्वगायकांकडून गाऊन घेतले होते. दिग्दर्शक मेहबूब खान यांनी चित्रीकरण करीत असताना चित्रपटातील इतर काही गीतांबरोबरच वरील गीतही चित्रित केले. त्यानंतर चित्रित झालेल्या भागाची कच्ची प्रिंट (रश) मेहबूब खान यांच्याकडे आली. वरील गीताची कच्ची प्रिंट पाहण्यासाठी मेहबूब खान यांनी नौशाद यांना पाचारण केले. नौशाद यांनी संगीतबद्ध केलेले गीत आपण किती परिणामकारकपणे चित्रित केले आहे हे मेहबूब खानना नौशाद यांना दाखवावयाचे होते. मेहबूब खान यांचे बोलावणे आल्यावर नौशाद आले. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर मेहबूब खान यांनी नौशाद यांना गीताची कच्ची प्रिंट दाखविली आणि चित्रित झालेले "दुख भरे दिन बीते रे भय्या..." हे गीत नौशाद एकाग्रतेने न्याहाळू लागले. समूहगान समाप्त होताच मुख्य आवाजांमधे गीत सुरू झाले आणि ते पाहताच नौशाद यांनी कपाळाला हात लावला ! नौशाद मेहबूब खानना म्हणाले, आपण घोडचूक करून ठेवली आहे ! नौशाद यांनी असे म्हणताच मेहबूब खान यांनी चकित होऊन त्यांना विचारले, की काय घोडचूक केलीय मी ? त्यावर नौशाद त्यांना म्हणाले, हा आशा भोसले यांचा आवाज, हा शमशाद बेगम यांचा आवाज, हा मोहम्मद रफी यांचा आवाज आणि हा मन्ना डे यांचा आवाज ! आपण तो एकाच व्यक्तिरेखेवर चित्रित केला आहे. आता हेच पाहा ना, "देख रे घटा घिर के आई" ही ओळ आशा भोसले यांची आहे आणि "रस भर-भर लाई" ही ओळ शमशाद बेगम यांची आहे. या दोन्ही ओळी एकापाठोपाठ एक येतात. आपण त्या दोन्ही नरगिस यांच्यावरच चित्रित केल्या आहेत. त्याचप्रमाणे रफी यांच्या आवाजातील "छेड ले गोरी मन की वीणा" ही ओळ आपण राज कुमार यांच्यावर चित्रित केली आहे आणि लगेच मन्ना डे "रिमझिम रुत छाई" ही ओळ गाऊन पूर्ण करतात. हे दोन भिन्न आवाज आहेत पण आपण ते एकाच व्यक्तिरेखेवर चित्रित केले आहेत. नौशाद यांचे हे निरीक्षण ऐकून मेहबूब खान क्षणभर भांबावले. नौशाद म्हणाले, की या गीताचे पुन्हा चित्रीकरण करावयास हवे. ते ऐकून मेहबूब खान त्यांना म्हणाले, नौशादजी, मी पाण्यासारखा पैसा तर खर्च केला आहेच शिवाय या गीताच्या चित्रीकरणावरही फार परिश्रम घेतले आहेत. आता हे गीत मी दुसऱ्यांदा चित्रित नाही करू शकत ! मेहबूब खान यांचे मत ऐकून नौशाद त्यांना म्हणाले, की मेहबूब साहेब, आपले नाव आणि कीर्ती मोठी आहे. मेहबूब खान यांच्यासारख्या दिग्दर्शकाने इतकी मोठी चूक केली म्हणून लोक हसतील ! नौशाद यांनी असे म्हणताच मेहबूब खान यांनी क्षणभर विचार केला पण लगेच ते नौशादना म्हणाले, की नौशाद भाई, आपण संगीतबद्ध केलेले हे गीतच इतके दमदार आहे की प्रेक्षकांचे लक्ष माझ्या या चुकीकडे जाणारच नाही ! आपण माझे हे शब्द ध्यानात ठेवा; असेच होईल !`मदर इंडिया' प्रदर्शित झाला आणि मेहबूब खान यांनी म्हटले होते अगदी तसेच घडले. हा चित्रपट आणि त्यातील गीते इतकी काही लोकप्रिय झाली की लोकांचे लक्ष मेहबूब खान यांच्या चुकीकडे गेलेच नाही !

अनिल रा. तोरणे
९२२६१६०६५४

# ऐकावे जनाचे परी



उमेश मोहिते
संपर्क ७६६६१८६९२८

आधुनिक केसरी

**अमित नांवाचा एक आठवीत शिकणारा मुलगा होता आणि त्याला पोहणे खूप आवडत असे,म्हणून तो रोज सकाळी गावाबाहेरच्या नदीला पोहायला जात असे.तासभर मनसोक्त पोहून तो घरी येत असे. रोजच्याप्रमाणे आज सकाळी तो पोहून घराकडे येत असताना जुन्या स्थानकाजवळ त्याला छोटेसे कुत्रीचे पिलू दिसले.तो काही वेळ त्या गोंडस नि देखण्या पिलाकडे बघतच राहिला.मग त्याने मनाशी ठरवले आणि ते गुबगुबीत पिलू पाळण्यासाठी घरी घेऊन निघाला. अवघ्या दोन मिनटानंतर त्याला गल्लीतील बालूदादा भेटला आणि त्याने विचारले, अमित, बकरीचं पिल्लू कुठं नेतोयस ?ॅहॅरे काहीही सांगू नको, हे बकरीचं पिलू नसून कुत्र्याचं पिलू आहे." अमित हसतच त्याला म्हणाला आणि आपल्या नादातच निघाला.नंतर पुढे पाच मिनटातच मॉर्निंग वॉकहून परतणाऱ्या श्रीधरकाकांनी त्याला हटकले.**

अमित नांवाचा एक आठवीत शिकणारा मुलगा होता आणि त्याला पोहणे खूप आवडत असे,म्हणून तो रोज सकाळी गावाबाहेरच्या नदीला पोहायला जात असे.तासभर मनसोक्त पोहून तो घरी येत असे. रोजच्याप्रमाणे आज सकाळी तो पोहून घराकडे येत असताना जुन्या स्थानकाजवळ त्याला छोटेसे कुत्रीचे पिलू दिसले.तो काही वेळ त्या गोंडस नि देखण्या पिलाकडे बघतच राहिला.मग त्याने मनाशी ठरवले आणि ते गुबगुबीत पिलू पाळण्यासाठी घरी घेऊन निघाला. अवघ्या दोन मिनटानंतर त्याला गल्लीतील बालूदादा भेटला आणि त्याने विचारले, अमित, बकरीचं पिल्लू कुठं नेतोयस ?ॅहॅरे काहीही सांगू नको, हे बकरीचं पिलू नसून कुत्र्याचं पिलू आहे." अमित हसतच त्याला म्हणाला आणि आपल्या नादातच निघाला.नंतर पुढे पाच मिनटातच मॉर्निंग वॉकहून परतणाऱ्या श्रीधरकाकांनी त्याला हटकले, अमित,बकरीचं पिलू घेऊन तू कुठं निघालास ? त्यांच्या प्रश्नाने तो जरासा वैतागलाच ! तो किंचित संतापाने म्हणाला, " काका,तुम्हाला दिसत नाही का कुत्र्याचं पिलूय ते ? बेटा, हे बकरीचं पिलू आहे .. " काका शांतपणे म्हणाले.पण त्यांच्याकडे अधिक ध्यान न देता अमित निघाला. पण तो चौकात येताच त्याच्याजवळ अचानकच त्याचा वर्गमित्र बाळ्या आला आणि म्हणाला, अमित,बकरीचं पिलू पाळायला नेतोस काय ? तुझंही डोकं फिरलंय काय की त्या दोघांसारखं ? अरे, हे कुत्र्याचं पिलू आहे ना ." तो चिडून म्हणाला. बेट्या,बकरीचंय ना ? विचार कोणालाही .. " बाळू म्हणाला. बरं, ठीकाय, असू दे बकरीचं.. अमित त्याला तणक्यानं म्हणाला आणि घराकडे चालू लागला.तो चार पावले चालून जाताच त्याच्या मनात विचार आला... आधी बालूदादा म्हणाला, हे बकरीचं पिलूय. काका नि बाळयाही तेच म्हणाले, मग हे बकरीचं तर पिलू नसंन ? ते तिघंही खोटं कशाला बोलतील ? बहूतेक आपलीच चूक झालीय याला ओळखण्यात.. या विचारासरशी अमितने पिलाकडे संशयाने पाहिले आणि ते बकरीचंच पिलू असेल म्हणून ते पिलू रस्त्याकडेला सोडून दिले ; व तो घाईने चालू लागला. पण त्याचा लळा लागलेले ते छोटेसे पिलू त्याच्या मागे ' कुंई कुंई ' करीत धावू लागले.एवढयात महादेव मंदिराकडे निघालेल्या सोनाआजीने त्याला हसतच विचारले, अमित, कुत्र्याचं पिलू कित्ती छानंय रे .. उचलून घेतलेलं का सोडलंस अहो आजी, ते बकरीचं पिलू आहे ; कुत्र्याचं नाही .. " अमित म्हणाला आणि ' ते ' पिलू आपल्या मागे मागे घरी येऊ नये म्हणून तो धावतच निघाला... .. बोध : ऐकावे जनाचे परि करावे मनाचे ..

# नवरात्रोत्सवाचे महत्त्व व उद्देश

आधुनिक केसरी

**भारतामध्ये गेल्या कित्येक वर्षांपासून जागतिक महिला दिन साजरा केला जातो तो भारतातील प्रत्येक शहरामध्ये गावमध्ये साजरा केला परंतु साजऱ्या होण्याच्या प्रमाणात महिलांचा सन्मान इथे होतोच असं मला वाटत नाही. त्याचे कारण ही तसेच आहे आज विचार केला तर समाजात स्त्रियांनावर होणारे अन्याय अत्याचार पाहून महत्व तिचे असलेले आपल्यावर उपकार आपण विसरत आहो असे वाटते तेच पाहून अस सांगायचं आहे की युगा युगा पासून या सृष्टीला टिकवण्यासाठी मोलाचं योगदान स्त्रियांचं राहील अस इतिहासातुन दिसते. देश धर्म नीती टिकवण्यासाठी पूर्वी पासून पुरुषांनसोबतच सुद्धा स्त्रियांचं कार्य राहील आहे.**

वेळोवेळो आलेल्या संकटांना सामना करण्यासाठी स्त्रीया युगांपासूनच पूरषासोबत त्यांच्या खांद्याला खांदा देवुन संकटां समोर उभ्या राहत आल्या आहेत.आणि आज सुद्धा त्या त्याच पद्धतींने आपले कार्य करत आहे आपली भूमिका बजावत आहे. इतिहासात जर पाहिले त स्त्रियांनि आतापर्यंत केलेले अनेक पराक्रम आपल्याला दिसतील.आजपर्यंत जेव्हा जेव्हा पुरुषावर आणीबाणीचा वेळ आली तेव्हा तेव्हा स्त्रियांनी त्यातून मार्ग दाखविला त्यातून निघण्याचा विचार त्यांनी सांगितले आहे.

जेव्हा पुरुष होय चिंतातूर ।तेव्हा घरची लक्ष्मी सांगे विचार ।। तसेच अशा प्रकारे संतमाहात्म्यांनि स्त्रियांचं कार्य आणि महत्व सांगताना वेळोवेळी आपल्याला अभंगाच्या माध्यमातून ओळीच्या माध्यमातून दोहे सांगून वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे.याच उदाहरण सांगताना जगतगुरु तुकाराम महाराज आपल्या अभंगात पुरुषाच्या आधी स्त्रियांना महत्व देताना म्हणतात....

**कुळी कन्या पुत्र होतीजे सात्विक ।तयाचा हरीक वाटे देवा ।।**

तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सुद्धा ग्रामगीतेत महिलांचं महत्व सांगताना त्यांच्यावर एक अध्याय लिहतात आणि ते त्यामध्ये म्हणतात की ...

**विधीने सेवन उचित बोलिले । महिलेविन विश्व न चाले ।। आणि संत कबीर सुद्धा आपल्याला माऊलीच महत्व सांगताना म्हणतात की......**

**नारी निंदा मत करो , नारी रतन की खान हैं।**

**इस नारिसे कोकसे पैदा हुये. रामकृष्ण हनुमान है।** म्हणून आपण आज संत महापुरुषांनि केलेला उपदेश त्यांनी सांगितलं माऊलीच महत्व स्त्रियांनि आतापर्यंत केलेलं योगदान त्यांनी दिलेले बलिदान या गोष्टी आपण समजून घेवून.आज तिच्यावर होणारे अन्याय अत्याचार आपण थांबण्याचा बद करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.आणि जेव्हा हे त्याच्यावरचे अन्याय अत्याचार बंद होतील तेव्हाच मातृजातीचे व नवरात्री उत्सवाचे महत्व आपल्याला समजले असे म्हणतात येईल

**स्त्रीयेसारीखी मोहिनी नाही।**
**स्त्रीयेसारीखी वैरागिनी नाही।**
**स्त्रीयेसारखी मुलायम नाही।**
**आणि कठोर रणचंडीका ।।**

**ग्रामगीता**



महेंद्रा सावके
९६०४६८०६८३

# ऐन सुगीत सोयाबीनचे भाव का गडगडतात ?

आधुनिक केसरी

**यावर्षी मान्सून फार उशिरा आला.पेरण्या खोळंबल्या होत्या.बियाने आणि खतांच्या किंमती आकाशाला भिडल्या होत्या. कसेबसे गरज भागवून शेतकऱ्यांनी पेरणी केलेली. पावसाने यावर्षी चांगलीच दडी मारली होती. पेरलेले बी सगळे वाया गेलेले.दुबार पेरणी करावी लागली.पावसाने पुन्हा हुलकावणी दिली.अधूनमधून हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला.कसेबसे शेतातील पिकांची वाढ झाली. आपले शेतकरी बांधव सोयाबीन पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात करतात.दूर्दैव असे की सोयाबीन पिकावर वेगवेगळ्या कीडरोगांचा प्रादुर्भाव झाला आणि उत्पादन क्षमता घटली.**

एवढ्या सकंटांनंतरही आता सोयाबीनचे जे पीक काढणीला आले आहे ते सोयाबीन पिक काढणीचा भाव एकरी पाच हजारांहून अधिक आहे.हे ही सहन करत सध्या शेतकरी सोयाबीन पिकाची कापणी व रास करीत आहेत.आणि नेमके याच काळात सोयाबीनचे बाजारभाव रसातळाला गेले आहेत. यापुर्वी सोयाबीनचे बाजारभाव एवढे कमी कधीच झाले नव्हते.शेतकऱ्यांच्या शेतमालाला कवडीमोल करणारी ही परिस्थिती आहे.ही परिस्थिती निर्माण करणारी व्यवस्था दरवर्षी शेतकऱ्यांना अडचणीत आणत आहे.याचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे.ऐन सुगीत सोयाबीनचे बाजारभाव एवढे कमी का केले जातात? हे बाजारभाव कमी करणारी यंत्रणा कशी काय उदयाला आली ?याचा बारकाईने शोध घेतला पाहिजे. परंतु सत्ताधारी व विरोधक राजकारणी



याकडे मुद्दाम दूर्लक्ष करतात. शेतकऱ्यांना आणखी गरीब करणारी व व्यापारी वर्गाला गडगंज नफा मिळवून देणारी ही व्यवस्था मुळासकट उपटून टाकण्याची धमक आपल्या राजकारण्यांमध्ये व प्रशासनामध्ये नाही याचेच वाईट वाटते.

शेतात राबराब राबून शेतकऱ्यांनी पिकवायचं आणि शेतकऱ्यांच्या जीवावर व्यापाऱ्यांनी मोठं व्हायचं हे सर्रास सुरू आहे. ऐन सुगीत शेतमालाचे भाव कमी करुन व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या मजबुरीचा फायदा घेत शेतकऱ्यांचा शेतमाल कवडीमोल भावाने खरेदी करायचा. हा शेतमाल साठवून ठेवण्याची व्यवस्था करायची.कारखान्यांनी शेतमालाचे भाव वाढवले की व्यापाऱ्यांनी साठवलेला शेतमाल चढ्या भावाने विकायचा आणि गडगंज नफा कमवायचा हे षडयंत्र फार पुर्वीपासून सुरु आहे.या कारणास्तव शेतकऱ्यांच्या जीवनात आनंदाची पहाट कधीही उगवत नाही. आजकाल पाऊस बेभरवशाचा झालाय,खते व बियाणे प्रचंड महागले आहेत आणि मशागतीच्या कामाचा खर्च तिपटीने वाढलाय.यामुळे सगळे शेतकरी बांधव घायकुतीला आले आहेत. शेतात कितीही कष्ट केले, कितीही घाम गाळला आणि शेतीसाठी रक्ताचे पाणी केले तरीही हाताला काहीच लागत नाही.दरिद्री अवस्था जशीच्या तशी पाचवीला पुजलेली.म्हणून आवर्जून सांगावे वाटते की शेतकऱ्यांची ही अवस्था बदलायची असेल तर सत्ताधारी राजकीय लोकांची मुळात तशी इच्छा शक्ती असली पाहिजे.नुसत्या पोकळ घोषणा काय कामाच्या?

-बबन दामोदर गुळवे
९७३०९३९७३२.




गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# कष्ट मेहनतीचा स्तर फळाचे स्वरूप निर्धारित करत असतो

आधुनिक केसरी

**मेहनत कष्ट केल्याखेरीज काहिच शक्य नाही पण मेहनत कष्ट करताना त्याच स्वरूप कसं आहे यानुसारच अपेक्षित परिणाम दृष्टीक्षेपास येत असतात हे वास्तव आहे.जीवनात प्रचंड मोठ यश मिळावायच असेल तर आपली कष्ट मेहनत करण्या बाबतची कन्सेप्ट किलियर असली पाहिजे.उच्च दर्जाचं कष्ट अति उच्च दर्जाचं फळं प्रदान करत असत. कष्टाचा दर्जा फळांचं स्वरूप ठरवतं असतो. लाभाची उंची हि ज्या पद्धतीने अपेक्षित आहे त्याच पद्धतीने मेहनत देखिल करणं अपेक्षित असतं.**

दैनंदिन जीवनात आपण सर्व साधारणपणे शरिरिक श्रम म्हणजे कष्ट मेहनत समजतो पण उन्नती होण्यासाठी फक्त शारीरिक कष्ट पुरेसं नसतं . कष्ट हे फक्त शारीरिक नसून शरीरासोबतच बौद्धिक कष्ट चेतना स्तरावरील कष्ट अशा पद्धतीने मेहनतीचे वेगवेगळे प्रकार असतात आणि आपण ज्या प्रकारातील मेहनत करतो त्या प्रकारातील फळ आपल्याला निश्चित मिळत असतं .आपण कष्ट मेहनत करताना जो मेहनतीचा स्तर वापरतो तो फळ निर्धारीत करत असतो. मेहनत शारिरीक असेल तर फळाची मर्यादा देखिल निश्चित असते. मेहनत बौद्धिक स्तरावरील असेल तर फळांचं स्वरूप हे खुप मोठ असत आणि मेहनत कष्ट जर चेतना स्तरावरील असेल तर त्याचं फळ ऐतिहासिक असतं म्हणजे मेहनतीचा दर्जा हा ज्या पद्धतीने आहे त्या स्तरावरील त्या गुणवत्तेच फळ आपल्याला अर्जित होत असतं. त्याच पद्धतीने आपली मेहनत देखिल असली पाहिजे. फळ अपेक्षा आणि मेहनतीचे स्वरूप या मध्ये अंतर असेल तर अपेक्षित परिणाम येत नाही. मेहनत ही वेगवेगळ्या प्रकारची असते. मुख्यत्वे आपण कोणती मेहनत किती करतोय तोच आपल्या साठी यशस्वी परिणाम स्वरूप असतो. महणून फळांची अपेक्षा ही अभ्यास पुर्ण असली पाहिजे. अभ्यास पुर्ण निर्णय झाल्यानंतर मग आपली मेहनत त्या निरंतर प्रयत्न करत असतानाच त्या दिशेने मार्गक्रमण करत असताना यश संपादन करण्यासाठी प्रभावी पद्धतीने नियोजन आखता आलं पाहिजे. आखलेल नियोजन परिपूर्ण होण्यासाठी त्या पद्धतीने त्या अनुषंगाने प्रयत्न यशस्वी झाले तर अपेक्षित निकाल आपल्याला नक्कीच मिळेल या मध्ये शंका नाही परंतु मेहनत अपेक्षा आणि मेहनतीचा मार्ग हे सगळं व्यवस्थित जुळल पाहिजे. य या मध्ये कुठेही गडबड होता कामा नये.उच्चतम फळ सगळ्यांना अपेक्षित असतं ते अपेक्षित असण या मध्ये गैर काहीच नाही पण ज्या पद्धतीनं आपण मेहनत करतो अथवा आपल्या मेहनतीचा स्तर कोणता आहे यानुसारच त्याच उत्पन्न लाभ ठरत असतो. मेहनतीचे साधारणपणे तीन प्रकार आहेत एक शरिरिक कष्ट जे कितीही केलं तरी एक निर्धारित आशा मर्यादेत फळ अर्जित होत असत .शरीराला मर्यादा असतात शारीरीक श्रम करून आपण एक निश्चित अशा मर्यादे पर्यंतच लाभ मिळवु शकतो हे अगदी वास्तव आहे. पण जर हिच मर्यादा पार करायची असेल तर शरिरिक श्रम नाही तर बौद्धिक कष्ट करावे लागतील. तेव्हा आपल्याला इच्छित लाभ अर्जित करता येईल. बौद्धिक कष्ट मेहनत हि अफाट लाभ देणारी असते . तिसरा प्रकार म्हणजे चेतना स्तरावरील मेहनत याच बळ आणि फळ ऐतिहासिक असतं.चेतना स्तरावरील मेहनत जेव्हा फळास येते तेव्हा लक्ष्मी साक्षात प्रसन्न झाल्या सारखी बरसते.महणुन जीवनात आपण कोणती मेहनत किती जोरदार करतोय या पेक्षाही हि मेहनत कोणत्या कार्यावर करतोय त्यानुसारच त्याचा परतावा मुल्य निधरीत होत असत.मेहनत कष्ट हे वेगवेगळ्या पद्धतीच असतं.महणुन यशस्वी होण्यासाठी मेहनतीचं मुल्य



ओळखायला शिका आणि ज्या पद्धतीने उन्नती अपेक्षित आहे त्याच पद्धतीने मेहनत घेतली गेली तर निश्चितच हित होईल या मध्ये शंका नाही. जीवन हितार्थ मेहनतीचे स्वरूप समजलं पाहिजे जेणेकरून योग्य वेळी योग्य पद्धतीने स्मार्ट वर्क करता येईल व आपण ज्या पद्धतीने मेहनत घेतली त्याला न्याय पण मिळेल आणि आपली मेहनत कारणी पण लागेल त्या अनुषंगाने उचित फळ अर्जित करण्यासाठी योग्य असणारी मेहनत आपल्याला समजली पाहिजे आणि त्याच पद्धतीने हि मेहनत घेतली पाहिजे. तर निश्चित असं फळ लाभ मिळेल या मध्ये शंका नाही म्हणून शारिरीक कष्टा ऐवजी बौद्धिक कष्ट आणि त्या पेक्षाही चेतना स्तरावरील मेहनत हि अधिक फलदायी ठरत असते . म्हणून शारिरीक कष्ट करण्या ऐवजी बौद्धिक कष्ट आणि चेतना स्तरावरील मेहनत घेतली गेली पाहिजे.जेणेकरून भविष्य बदलणारे परिणाम आपल्याला अर्जित होतील.

# सरकारने निर्णय कॅबिनेटमध्ये घ्यायचे असतात कोणाच्या घरी नाही : अतुल लोंढे

## टोलनाक्यांवर सरकारच्या कॅमेऱ्यासोबत मनसेचे कॅमेरे कशासाठी ?

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील टोल प्रश्नावर मनसेने आंदोलन करताच



सरकार राज ठाकरेंच्या घरी जाते हे घटनाबाह्य आहे. शिंदे-फडणवीस-पवार सरकारने सर्व मर्यादा पार केल्या आहेत. राज ठाकरे यांच्या घरी सरकार जाते म्हणजे हे समांतर सरकार चालवल्यासारखे आहे. विरोधी पक्षाने जनतेचा एखादा मुद्दा सरकारकडे मांडला तर त्यावर सरकारने कॅबिनेटमध्ये निर्णय घ्यायचा असतो कोणाच्या घरी मंत्री व अधिकारी पाठवून नाही, अशी टीका प्रदेश काँग्रेसते मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली आहे.

यासंदर्भात प्रतिक्रीया देताना अतुल लोंढे पुढे म्हणाले की, राज्यातील येड्याचे सरकार विश्वास गमावलेले आहे म्हणून कोणीही येते व समांतर सरकार चालवू शकते अशा पद्धतीचा संदेश शिंदे सरकराचे मंत्री दादा भुसे यांनी राज ठाकरे यांच्या घरी जाऊन पत्रकार परिषद घेऊन दिला आहे. भ्रष्टाचार होत आहे, आम्ही भ्रष्टाचारी आहोत हे सरकारनेच मान्य केले आहे. तसेच टोल नाक्यांवर सरकारी कॅमेऱ्यांबरोबरच मनसेचे कॅमेरेही लावले जाणार आहेत, हे या घटनाबाह्य आहे. सरकारच्या कॅमेऱ्यांबरोबर मनसेचे कॅमेरे कशासाठी ? मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर गुरुवारी सायंकाळी टोल प्रश्नी बैठक घेतली आणि लगेच सकाळी रस्ते विकास मंडळाचे मंत्री दादा भूसे आदेशानुसार राज ठाकरे यांच्या घरी गेले. मंत्री भुसे व सरकारी अधिकाऱ्यांनी राज ठाकरे यांच्या निवासस्थानी हजेरी लावली. बेरोजगारांच्या प्रश्नावर, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर, महागाईच्या प्रश्नावर येड्याच्या सरकार एवढे तत्पर व गंभीर कधीच दिसले नाही पण राज ठाकरेंच्या मागण्यासंदर्भात सरकार मनसेच्या दारी, गेले. शिंदे सरकारला सत्तेत राहण्याचा काही अधिकार राहिलेला नाही. या सरकारचे उफराटे काम आहे. शासन आपल्या दारी आणि लोक देवाघरी तसेच भ्रष्टाचाराच्या दारी शासन आपल्या घरी, अशा पद्धतीची ही व्यवस्था असून हे निषेधार्ह आहे. सरकारवर लोकांचा विश्वास असला पाहिजे पण या सरकारने आपली विश्वासार्हता पूर्ण गमावली आहे त्यांना सत्तेवर राहण्याचा कुठलाही अधिकार नाही असेही लोंढे म्हणाले.

**महागाई, बेरोजगारी, शेतकरी प्रश्नावर जनता दारोदारी पण टोलप्रश्नी मात्र 'सरकार मनसेच्या दारी'!**

# मोलखेडा जि.प.शाळेत गायन, भावगीतांचा अमृत महोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा येथील जि.प. शाळा केंद्र सावळदबारा अमृतमहोत्सव सोहळा मोलखेडा दि. ११/१०/२०२३ रोजी संपन्न झाला. या निमित्ताने विविध कार्यक्रम या अमृतमहोत्सव सोहळ्यानिमित्त दुपारी तीन वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कलापथकचा कार्यक्रमातून जनजागृती करण्यात आली.
शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट लेझीम नृत्य व झांज पथक नृत्याने भावगीत,गायण कलाकार यांचे उपस्थितांचे स्वागत केले. आजी माजी विद्यार्थी व शिक्षक तसेच गावातील ग्रामस्थ बंधू भगिनी यांच्या उपस्थितीने शाळेतील वातावरण उत्साहाने, नवचैतन्याने भारावून गेले. अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त जि प प्रा शाळा मोलखेडा येथे देशभक्तीपर गीत ,भावगीत गायनाचा कार्यक्रम आयोजित केला होता .धामणगाव बढे येथील पोलीस कॉन्स्टेबल गायक श्री श्रीकृष्ण चव्हाण सर आणि त्यांची टीम यांनी बहारदार अशी देशभक्तीपर गाणी, पोवाडा, राज्यगीत, अभंग, शिवगीत,भजन यांचा सुंदर कार्यक्रम सादर केला. संगीत-गायन ही कला शेवटच्या माणसापर्यंत नेण्यासाठी ही गायक वादक मंडळी धडपड करीत आहे. याप्रसंगी सर्व विद्यार्थी, शिक्षक, गावकरी या कार्यक्रमाला उपस्थित होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांची समाजमन जोडणारी भजने यावेळी सादर करण्यात आली. सोयगाव पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी आढाव साहेब, विस्तार अधिकारी फुसे यांनी शाळा तपासणी करिता शाळेला भेट दिली .कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.सावळदबारा केंद्र शाळेचे मुख्याध्यापक यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती.




# शौर्य स्पोर्ट्स अकॅडमीचे जिल्हास्तरीय ज्यूडो स्पर्धेत यश

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथील शौर्य स्पोर्ट्स अकॅडमी च्या खेळाडूनी जिल्हास्तरीय ज्युडो स्पर्धेत 2 सिल्व्हर व 1 ब्राँझ पदकाची केली कमाई महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात इ ७ वी मध्ये शिकत असलेल्या कु वर्षा हरीभाऊ राऊत व इ ८ वी मध्ये शिकत असलेल्या दिपक तुळशीराम चव्हाण यांनी काल झालेल्या जिल्हास्तरीय ज्युडो स्पर्धेत सिल्व्हर मेडल ची कमाई केली तर जामनेर येथिल इंदिराबाई ललवाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इ १२ विज्ञान शाखेत शिकत असलेला दिनेश वासूदेव राऊत याने ब्राँझ मेडल प्राप्त केले तर हर्षल संतोष उदमले याने ज्युडो या स्पर्धेत उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. शौर्य स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूनी मिळविलेल्या यशाबद्दल विद्यालयाच्या महात्मा फुले शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय बाबूराव आण्णा घोंगडे मुख्याध्यापिका श्रीमती वैशाली घोंगडे, बनकर मॅडम व उपस्थित शिक्षक वृंद यांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. खेळाडूंना सावित्रीबाई फुले विद्यालयाचे क्रीडा शिक्षक तथा शौर्य स्पोर्ट्स अकॅडमी चे संचालक प्रशिक्षक हरीभाऊ राऊत यांचे मार्गदर्शन सुनिल पवार यांचे सहकार्या लाभले.या यशाबद्दल जळगाव जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव राजेश जाधव, महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाबूराव आण्णा घोंगडे यांच्या सह सर्व संचालक मंडळ मुख्याध्यापिका श्रीमती वैशाली घोंगडे ललवाणी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनिल चव्हाण उपप्राचार्य किरण मराठे श्रीमती कल्पना बनकर, श्रीमती माधूरी बारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



# घंटागाडी कामगारांच्या मागण्या मान्य; संप मागे घेण्याचे चंद्रपूर महानगरपालिकेचे कचरा संकलन कामगारांना आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** कचरा संकलन आणि वाहतुक या अत्यावश्यक सेवेत कंत्राटी तत्वावर काम करणारे घंटागाडी कामगार ६ ऑक्टोबरपासून संपावर गेले आहेत. यामुळे सणासुदीच्या काळात चंद्रपूर शहरातील नागरिकांची गैरसोय होत आहे. कचरा संकलनाच्या माध्यमातून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या कामगारांवर उपासमारीची पाळी येण्याची शक्यता आहे. महानगरपालिकेने त्यांच्या मागण्या मान्य केल्याने आपल्या कुटुंबाचे भवितव्य बघता कामगारांनी संप मागे घ्यावे, असे आवाहन मनपा प्रशासनाने केले आहे.

कचरा संकलन करणाऱ्या कामगारांनी पुकारलेला संप मागे घेण्यात यावा, यासाठी महानगरपालिका प्रशासनाने त्यांच्या मागण्या मान्य केल्याबाबत पत्र दिले आहे. याबाबतीत १० ऑक्टोबर रोजी उपायुक्त यांच्या समवेत सकारात्मक चर्चा झाली होती. त्यांच्या मागण्यांमध्ये जुन्या वेतन आश्वासनांचे पालन करणे, ३० मजुरांना पुन्हा कामावर घेणे आणि वेतन चिट्ठी नियमित देणे यांचा समावेश आहे.

झालेल्या चर्चेनुसार संदर्भ पत्राच्या अनुषंगाने कामगारांच्या पुढील मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत.

१) जुने कंत्राटदार जे वेतन देत होते त्यानुसार वेतन तात्काळ प्रभावाने लागू करून पुढील काळाकरीता देण्यात येईल.

२) जुन्या वेतन आश्वासनांचे पालन करून कामगारांना नवीन वेतन देण्यात येईल.

३) जे ३० कामगार कामावरून कमी करण्यात आले होते त्या कामगारांना पुन्हा कामावर घेण्यात येईल व वेतन चिट्ठी नियमित देण्यात येण्याचे देखील मान्य करून तसे निर्देश कंत्राटदारांना देण्यात आले आहे.

स्वच्छता सेवा ही अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने शहरातील नागरिकांची भविष्यात कुठलीही गैरसोय होऊ नये यादृष्टीने कामगारांनी संप मागे घेऊन नियमित कचरा संकलन सुरू करावे, असे आवाहन मनपा आयुक्त विपिन पालीवाल यांनी केले आहे.



# संचालकपदी निवड झाल्याबद्दल मु.अ. विलास पवार यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** ज्ञानप्रसारक मंडळ येरमाळा संस्थेच्या संचालकपदी विद्याभवन हायस्कूल कळंबचे मुख्याध्यापक विलास पवार यांची निवड करण्यात आली आहे. याबद्दल त्यांचा सत्कार नुकताच प्रशालेमध्ये जिल्हा परिषद मुलांची शाळा कळंबचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक सी.आर घाडगे, विशाल वाघमारे, एल.आर. धावारे, मारुती दादा गायकवाड यांच्या वतीने करण्यात आला. तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी प्रशालेच्या उपमुख्याध्यापिका श्रीमती पाटील एस.डी, पर्यवेक्षक दिगंबर खामकर, डॉ. कोळी जे एन, स्वाती घाडगे,बचाटे आर आर, गाढवे उमा, लोमटे बी.बि, रामटेके आनंद, विक्रम मयाचारी, बारकुल एस एस, ढोले विजयकुमार, विनोद सागर, ज्योतीराम सोनके, शेख ए.सी,पाटील एस एस, रविकांत कोल्हे, आदींसह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# पनवेलचे माजी आ. विवेकानंद पाटील यांच्यावर ईडीची कारवाई

## कर्नाळा बँक घोटाळ्या प्रकरणी १५२ कोटींच्या मालमत्ता जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**हेमंत धायगुडे**

**पनवेल :** शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार व कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष विवेकानंद शंकर पाटील यांची स्थावर स्वरूपाची मालमत्ता ईडीकडून जप्त करण्यात आली.

माजी आमदार विवेकानंद शंकर पाटील यांच्या १५२ कोटी रुपयांच्या मालमत्तेवर ईडीकडून कारवाई करण्यात आली.या मालमत्तेमध्ये भूखंड, बंगला तसेच रहिवाशी संकुलाचा समावेश करण्यात आला आहे.

पनवेलची चार वेळा आमदारकी विवेकानंद पाटील यांनी भुषवली.विवेकानंद पाटील हे कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष होते.



दरम्यान याच बँकेच्या घोटाळ्याप्रकरणी त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आल्याचं ईडीकडून सांगण्यात आलं आहे. त्याच पार्श्वभूमीवर ईडीकडून त्यांच्या १५२ कोटींच्या मालेमत्तेवर तात्पुरती टाच मारण्यात आली. तसेच या मालमत्तेमध्ये विवेकानंद पाटील यांच्या कर्नाळा महिला रेडीमेड गारमेंट्स कॉर्पोरेटिव्ह सोसायटी लिमिटेड या मालमत्तेचा देखील समावेश करण्यत आला आहे. तर आतापर्यंत या प्रकरणात एकूण ३८६ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली. पनवेलचे माजी आमदार विवेकानंद पाटील हे रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे तत्कालीन अध्यक्ष असताना १ हजार कोटी रुपयांचा महाघोटाळा झाल्याचा आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला होता.माजी आमदार आणि बँकेचे तत्कालीन अध्यक्ष विवेकानंद पाटील यांनी हा घोटाळा केल्याचा आरोपही सोमय्या केला होता. सहकार खात्याने आणि रिझर्व्ह बँकेने या बँकेचे ऑडिट केले. त्यावेळी कोट्यवधी रुपयांची बेनामी बोगस खाती असल्याचं समोर आलं. दरम्यान मागील काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात बेनामी बोगस खातेदारकांच्या नावाने खाते उघडण्यात येत होते.या खात्यांमध्ये कोट्यवधी रुपयांची कर्जरुपी रक्कम जमा केली जात होती.हीच रक्कम आपल्या मालकीच्या ट्रस्टमध्ये विवेकानंद पाटील यांनी वळवल्याचा आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला होता.

**नेमकं प्रकरण काय?** : माजी आमदार विवेकानंद पाटील यांच्या कर्नाळा बँकेत ५१२ कोटी रूपयांचा घोटाळा झाल्याची माहिती देण्यात आली .तर या प्रकरणी माजी आमदार विवेकानंद पाटील हे मुख्य आरोपी असल्याची बाब समोर आली होती .फेब्रुवारी २०२० मध्ये कर्नाळा बँक घोटाळा प्रकरणी १७ संचालकांवर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता .या दरम्यान तत्कालीन गृहखातं हे या प्रकरणाची चौकशी करण्यात चालढकलपणा करत असल्याचा आरोप देखील भाजप आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडुन करण्यात आला होता .त्याच पार्श्वभूमीवर ईडीकडे मार्च २०२० रोजी लेखी तक्रार दाखल करण्यात आली होती .त्यानंतर ईडीनं याप्रकरणी तपास सुरु केला .चौकशी अंती अखेर १२ ऑगस्ट २०२१ रोजी विवेकानंद पाटील यांना ईडीकडून अटक करण्यात आली .त्यावेळी त्यांची २३४ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली .



# कळवण शिवसेनेच्या वतीने सुषमा अंधारेंच्या प्रतिमेस जोडेमारो आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**कळवण :** शिवसेना उबाठा गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारेने नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे यांच्याबाबत केलेल्या बेताल वक्तव्याच्या निषेधार्थ आज कळवण तालुका शिवसेनेच्या वतीने जोडेमारो आंदोलन करण्यात येऊन तीव्र शब्दात निषेध नोंदविण्यात आला तसेच सुषमा अंधारे यांच्यावर त्वरित कारवाई करण्यात यावी अशा आशयाचे निवेदन कळवण पोलिसांना देण्यात आले.

यावेळी निवेदनात म्हटले आहे की, दोन ते तीन दिवसांपूर्वी नाशिकरोड हद्दीतील शिंदेगावात पोलिस प्रशासनाने छापा मारून एम. डी. ड्रॅग्सचे दोन कारखाने उध्वस्त करीत संशयित भूषण पाटिल व ललित पाटील नामक या दोन व्यक्तींना अटक करण्यात केली होती. सदर प्रकरणात नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे यांचा काही एक संबंध नसताना बेताल व्यक्तव्य करण्यात पटाईत असणाऱ्या अंधारेबाईने या प्रकरणात थेट पालकमंत्र्यांचे संबंध असल्याचा आरोप करून बेताल व्यक्तव्य केले या वक्तव्याच्या निषेधार्थ आज कळवण तालुका शिंदे गट शिवसेनेच्या वतीने नाशिक जिल्हाप्रमुख भाऊलाल तांबडे यांच्या मार्गदर्शनाखाली निषेध नोंदवीत कळवण बसस्थानक येथे सुषमा अंधारे यांच्या प्रतिमेला जोडेमारो आंदोलन करण्यात आले. तसेच अंधारेवर कारवाई करण्यात यावी अशा आशयाचे निवेदन कळवणचे पोलीस निरीक्षकांना देण्यात आले. यावेळी निवेदन कळवण पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक बबन पाटोळे यांनी स्वीकारले.

याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख जितेंद्र पगार, तालुकाप्रमुख शरद पगार, युवासेना तालुकाप्रमुख संदीप वाघ, सोशलमीडिया प्रमुख ललित आहेर, शहर प्रमुख सागर जगताप, महिला आघाडी प्रमुख सत्यवती आहेर, महिला आघाडी शहरप्रमुख अर्चना पगार, महिला आघाडीच्या उप शहरप्रमुख सीमा पगार, किरण पगार, संदीप पगार, दीपक पगार, गौतम पाटील, रवी मोहन, गुलाब पाटील, जाकीर शेख, वैशाली सोमवंशी, सोनल येवले, सुरेखा पगार आदीसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते..

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जळगाव जामोदच्या वतीने शासनाच्या धोरणाचा जाहीर निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** कंत्राटी पद्धतीने नोकरभरती, दत्तक शाळा योजना. रुग्णालय खाजगी कंपनी ना चालविण्यासाठी देणे, शासकीय रुग्णालय नांदेड, संभाजीनगर, ठाणे, नागपूर येथील रुग्णांच्या मृत्यू ची जबादारी घेऊन मा.आरोग्य मंत्री यांनी राजीनामा देण्यात यावा.

पटसंख्ये अभावी शाळा बंद करण्यात येणे शेतकऱ्यांना पीक विमा व आर्थिक मदत तात्काळ मिळण्यात यावी.

वरील युवक, शेतकरी, आर्थिक दुर्बल घटकाला भेडसावनार्या विषयांवर शासन अतिशय उदासिन आहे. कंत्राटी भरती सारखे तुघलकी निर्णय घेऊन शिंदे-फडनवीस-पवार यांच तिघाडी सरकार आधीच बेरोजगारीच्या समस्येने ग्रासलेल्या युवकांना वेठिस धरण्याच काम करित आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रसेनजीत पाटिल यांच्या नेतृत्वात वरील जनतेला भेडसावनार्या समस्यांसंदर्भात महाराष्ट्र सरकार विरोधात निषेध आंदोलन करुन जळगांव जामोद तहसिल कार्यालय येथे निवेदन देण्यात आले. कंत्राटी भरतीचा निर्णय मागे न घेतल्यास रस्त्यावर उतरून उग्र आंदोलनाचा ईशारा प्रसेनजीत पाटिल यांनी दिला. यावेळी तालुकाध्यक्ष प्रमोद सपकाळ, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष एम.डी.साबीर, ईरफान खान, करीम खान, संजय ढगे, संजय देशमुख, सिध्दार्थ हेलोडे, मोहसिन खान, दत्ता डीवरे, निजाम राज, सतीष तायडे, अरविंद जुमडे, सदाशिव जाने, ताहेर माही, शंकर अढाव, पवन डिवरे, रेहान अहमद, शेख जावेद, शे. फैजान, अंकित हेलोडे, रेहान अहमद जियाउल्ला: देशमुख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# लोणंद येथे श्रामणेरसह शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** ता.खंडाळा येथे २७ ऑक्टोबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ.भीमराव यशवंतराव आंबेडकर ( ट्रस्टी राष्ट्रीय कार्याध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा) यांच्या प्रमुख उपस्थितीत पहिली धम्म परिषद आयोजित करण्यात आलेली आहे. तसेच दि. २२ ऑक्टोबर ते २६ ऑक्टोबर या दरम्यान निवास श्रामणेर शिबिर पुज्य भंते धम्मानंद बोधी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न आहे, अशी माहिती पंचशील बौद्धविहार येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेतून देण्यात आली. यावेळी भारतीय बौध्द महासभेचे सातारा जिल्हा पूर्वचे अध्यक्ष श्रीमंत घोरपडे सर, भंते धम्मानंद बोधी, खंडाळा तालुका अध्यक्ष यशवंत खुंटे, अविनाश जगताप,डॉ.विलास कांबळे, दादासो कांबळे, लोणंद शाखेचे अध्यक्ष सज्जन खरात,सरचिटणीस संतोष मा.खरात, कोषाध्यक्ष दत्तात्रय खरात व महिला शाखेच्या अध्यक्षा प्रिती खरात, सरचिटणीस स्वाती खरात,कोषाध्यक्ष संगिता खरात, बाळासाहेब खरात,एन.सी.खरात, बंटी खरात तसेच लोणंद मधील दोन्ही शाखेचे पदाधिकारी उपस्थित होते.महिलांसाठी उपासिका शिबीर १८ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर या दरम्यान होणार असून समता सैनिक दल शिबीर २१ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबर या दरम्यान संपन्न होत आहे. भारतीय बौद्ध महासभा पुरुष शाखा लोणंद, भारतीय बौद्ध महासभा महिला शाखा लोणंद, दर रविवारी चला बुद्ध विहारी वंदना मैत्री संघ लोणंद, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती लोणंद, यांच्या वतीने या विविध शिबीरांचे आयोजन पंचशील बुध्द विहार लोणंद या ठिकाणी करण्यात येत आहे.शिबिरांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे.

# लाखोंच्या संख्येने अंतरवाली येथे उपस्थित राहावे : प्रा.जीवन कोलते पाटील

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील मराठा समाज बांधवांनी 14 तारखेला अंतरवाली सराटी येथे लाखोच्या संख्येने उपस्थित रहा, असे आवाहन जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते व प्रा.मदनभाऊ डोखळे डाभा यांनी केले आहे. मराठ्यांना आरक्षण मिळावे म्हणून हा लढा गेल्या 40 वर्षांपासून चालू आहे. यासाठी प्रथम बलिदान दिले ते आण्णासाहेब पाटील यांनी. यानंतर या आरक्षणासाठी अनेकांनी आपले बलिदान दिले. न भूतो न भविष्यती असे मोठ मोठे 58 मोर्चे काढले तरीपण आपणास अद्याप आरक्षण मिळाले नाही. प्रत्येक पक्षातील सत्ताधाऱ्यांनी आपल्याकडे सतत दुर्लक्ष केले. आपल्याच समाजाचे बहुसंख्य आमदार-खासदार असून देखील त्यांनी समाजाच्या प्रश्नांकडे सतत दुर्लक्ष केले, फक्त निवडणुकीत त्यांना समाज आठवतो. या प्रस्थापित मराठा नेत्यांनी गरीब मराठ्यांकडे कधीच लक्ष न दिल्यामुळे आज मराठा समाजाची स्थिती दयनीय झाली आहे. पूर्वीसारखी शेती आता राहिली नाही. प्रत्येकाला एक दोन एकर जमीन राहिली, त्यातही अनेक जण भूमिहीन झाले आहेत. वेळेवर पाऊस पडत नाही, पडला तर बाजारभाव नाही. या कारणांमुळे शेती व्यवसाय तोट्यात आला आहे. शेतीवर जो खर्च केला तो पण वसुल होत नाही.उ पजीविकेचे दुसरे साधन नाही, मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी पैसा नाही, जे शिकले त्यांना नोकरी नाही. म्हणून समाजाला आरक्षण मिळण्याची अत्यंत गरज आहे. अतिशय गरीब व सामान्य कुटुंबातीलमनोज जरांगे पाटील या प्रामाणिक कार्यकर्त्याने मराठा आरक्षण मिळावे म्हणून आता मोठा लढा उभारला आहे आजपर्यंत शंभर पेक्षा जास्त आंदोलन केले आहेत, 27 उपोषण केली आहेत. ते अतिशय सामान्य कुटुंबातील आहे. समाजास आरक्षण मिळावे म्हणून ते जीवाची पर्वा न करता लढत आहे. ते कोणाच्याही दबावाला व अमिषाला बळी न पडता लढा देत आहे.शासनास आपल्या वेदना कळविण्यासाठी, आपली एकजूट दाखविण्यासाठी, जरांगे पाटील यांना भक्कम पाठिंबा देण्यासाठी, या निद्रिस्त शासनास जागे करण्यासाठी आपण लाखोंच्या संख्येने आज आंतरवाली सराटी येथे जायचे आहे. मराठा आरक्षणाचा हा लढा आता अंतिम टप्प्यात आला आहे. आपल्या भावी पिढीच्या भविष्यासाठी, आपले आरक्षणाचे ध्येय गाठण्यासाठी आता फक्त आपली एकजूट पाहिजे. अशा प्रकारच्या कोणत्याही सबबी न सांगता प्रत्येक घरातून किमान एक तरी सदस्य आंदोलनासाठी निघाला पाहिजे. आता कंटाळा करायचं नाही. आता नाही तर कधीच नाही हे लक्षात ठेवा. आपली एकजूट व शक्ती दाखविण्याची हीच योग्य वेळ आहे म्हणून सर्वांनी या आंदोलनात सहभागी व्हावे.असे आवाहन प्रा जीवन कोलते पाटील व प्रा.मदनभाऊ डोखळे सामाजिक कार्यकर्ते डाभा, सावळदबारा ता सोयगाव यांनी केले आहे.

# दिवाळीपूर्वी पीक विमा आर्थिक मदत द्यावी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना सरसकट पीक विमा लागू



करून सरसकट पीक विमा मिळावे अशी मागणी सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केली आहे. मागील अनेक वर्षे पासून शेतकरी निसर्गाच्या लहरीपणाचे बळी पडत आहेत कधी उत्पादनात घट तर कधी शेतीमाल भाव कमी मिळतो निसर्गाच्या लहरीपनामुळे सोयाबीन कापूस पिकांवर रोगाचा प्रादुर्भाव पडत असल्याने शेतकरी हतलब झाला आहे शेतीमाल ला योग्य भाव मिळत नसल्याने शेतीवर आपले कुटूंब चालवणारे शेतकरी आपले मुलाचे शिक्षण मुला मुलीचे लग्न आपल्या गरजा पुढे शेतकरी हतलब झाला आहे.आजही सावळदबारा परिसरात नांदा तांडा, देव्हारी टिटवी मोलखेडा पिंपळवाडी चारुतांडा घाणेगाव तांडा सोयाबीन व कापूस भाव नसल्याने माल घरात पडून आहे. शेतकऱ्याच प्रश्न वर राजकारण केले जाते मात्र आज शेतकरी संकताट आहे मात्र या प्रश्न कडे राजकीय नेते मंडळी याचा विचार करतील का शेतकऱ्याच्या अशा व्यवस्थेमुळे काही दिवसात शेती संपुष्टात येईल शेतीकडे वळणाऱ्या ची संख्या दैनदिन कमी होत आहे मात्र शासनाने शेतकऱ्यांना सरसकट पीक विमा आर्थिक मदत लवकरच दयावी अशी मागणी माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी राज्याचे मंत्री अब्दुल सत्तार यांच्या कडे केली आहे.




# घरांच्या भिंतींना केलं बोलकं; विद्यार्थ्यांचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** विद्यार्थ्यांच्या क्रियाशिलतेला योग्य वळण दिलं की त्यांच्या हातून अनेक चांगले काम सहज होऊ शकतं. शालेय अभ्यासक्रमाव्यतिरिक्त जेव्हा जेव्हा विद्यार्थ्यांना नवीन काहीतरी करायला मिळतं तेव्हा तेव्हा त्यांच्यातील कलात्मकता, त्यांच्यातील सुप्त गुण नेहमीच बाहेर आलेले पहायला मिळतात . असाच अनुभव चंद्रपूर नागपूर मार्गावर असलेल्या दत्त नगर येथे अनुभवायला मिळतोय.

चंद्रपूर महानगर पालिकेच्या वतीने दरवर्षी पर्यावरण पूरक गणेश मंडळ स्पर्धा आयोजित केली जाते. त्या अनुषंगाने मागील तीन वर्षापासून श्री नवयुक बाल गणेश मंडळ, दत्त नगर, नागपूर रोड, चंद्रपूर या स्पर्धेत प्रथम क्रमांक घेत आलेला आहे. या वर्षी सुद्धा महानगर पालिकेच्या वतीने गणेश मंडळ साठी होत असलेल्या स्पर्धेत भाग घेतला असून त्या उपक्रमाचा एक भाग म्हणून दत्त नगर येथील अनेक घरांचा भिंतीवर अनेक समाजोपयोगी विषयांची चित्रे विद्यार्थ्यांनी रंगविली आहेत. ज्या मध्ये स्वच्छ भारत सुंदर भारत, पाणी वाचवा, झाडे लावा, स्त्री - पुरुष समानता, पंच तत्व लोगो, मुलगी शिकवा, मुलगी वाचवा, सौरऊर्जे चे महत्व, डेंग्यू जनजागृती, वारली चित्रकला, व्यसन मुक्ती, असे अनेक



विषय विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून साकारले आहे जे सर्व परिसरातील जनतेचे लक्ष वेधून घेत आहे. ही सर्व चित्रे तयार करण्यामध्ये केतन बुरडकर, मनप्रीत गील, रिया गेडाम, विधी राळे, आदित्य अर्जूनकर, क्षितिज राळे, अनोखी देशपांडे, कृतिका अर्जूनकर, विदिशा नक्षिने, निशा खंदारे, स्नेहल कालडींगे, युगांत चींचाळकर, वेदांत पोटे, शीतल सिडामा, संदेश भिडेकर, मनी सोंत्रे, सतीश चंदेल, आकाश पोटे, यांनी सहभाग घेवून दत्त नगर, नागपूर रोड, चंद्रपूर येथील भिंतीना बोलके केले. परिसिरातील त्याविद्यार्थ्यांनी केलेल्या या अनोख्या उपक्रमाबाबत विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. चंद्रपूर च्या विविध परिसरातील अनेक नागरिक ही चित्रे पाहण्यासाठी येत आहे.

# गोळाफेक क्रीडा स्पर्धेत मोरेश्वर विद्यालयाची विभागीय स्तरावर निवड

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजुर :** जालना येथे झालेल्या पावसाळी स्पर्धेत



17 वर्षीय मुलांच्या वयोगटातून वैयक्तिक पातळीवर गोळाफेक क्रीडा प्रकारात राजूर येथील मोरेश्वर विद्यालयाचा विद्यार्थी अजिंक्य टेपले याने जिल्हास्तरावर घवघवीत यश मिळवले असून पुढील क्रिडा स्पर्धेसाठी त्याची विभागीय स्तरावर निवड झाली आहे. याकामी त्यास क्रीडा शिक्षक व इतरांचे वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. पुढील स्पर्धेसाठी गोळफेक क्रीडा प्रकारात तो विभागीय स्तरावर जालना जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. त्याच्या या क्रीडा स्पर्धेतील यशाबद्दल मोरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव तथा केंद्रीय रेल्वेमंत्री रावसाहेब पाटील दानवे, संस्थेचे कोषाध्यक्ष आमदार संतोष पाटील दानवे संस्था अध्यक्षा श्रीमती निर्मलाताई दानवे तसेच राजूर येथील प्राचार्य, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अजिंक्य टेपले या विद्यार्थ्याचे अभिनंदन केले.

# वालूर येथे राष्ट्रवादीला पडले खिंडार; अध्यक्षासह कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** सेलू तालुक्यातील वालूर येथील शरद चंद्र पवार गटातील राष्ट्रवादीचे शाखा अध्यक्ष सोपान धापसे यांनी राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी देत माजी आमदार परभणीचे भाजप लोकसभा प्रमुख रामप्रसाद बोर्डीकर व भाजपाचे जिल्हाध्यक्ष श्री संतोष मुरकुटे यांच्या प्रमुख उपस्थितीत सेलू येथील परभणी लोकसभा आढावा कार्यक्रमात जाहीर प्रवेश केला त्यांच्यासोबत माऊली पितळे, रंगनाथ धापसे, विलास धापसे, राजेश आबुज, परमेश्वर खरवे, राजेभाऊ खरबे, निखिल धापसे, माऊली तळेकर, कैलास धापसे, बालाजी तळेकर, रामेश्वर धापसे, आदि कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला त्याचे स्वागत वालूर ग्रा.प.सदस्य. विलास सोनवणे,जलाल भाई,वाहेद खान पठाण,.बंडू अपा आरे,भगवान खपले गजानन रोकडे,राजेश सोनवणे यांनी केले





# कै. उत्तमराव जोगवाडकर आश्रम शाळेचे यश

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** छत्रपती शिवाजी महाविद्यालय परभणी या ठिकाणी जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेचे आयोजन दि.१२गुरुवार रोजी करण्यात आले होते. यामध्ये येथील कै. उत्तमराव जोगवाडकर माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेच्या खेळाडूंनी १०० मीटर धावणे २००मीटर धावणे ११० मीटर हार्डल्स व४०० मीटर हर्डल्स मध्ये प्राविण्य संपादन केले. यामध्ये पंकज नामदेव राठोड याने ४००मीटर हार्डल्स मध्ये जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवला असून, त्याची विभागीय पातळी वर निवड झाली आहे तर २००मीटर हार्डल्स मध्ये सुद्धा तृतीय क्रमांक मिळवला आहे. तसेच राठोड दीपक नामदेव यांनी ११० मीटर हार्डल्स मध्ये अंडर नाईन्टीन गटातून तृतीय क्रमांक पटकावला आहे व जाधव अभिषेक भगवान याने १०० मीटर रनिंग मध्ये अंडर नाईन्टीन गटातून तृतीय क्रमांक मिळवला आहे. या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष शशिकांतराव देशपांडे, सचिव विजयराव कान्हेकर समाजकल्याण विभाग परभणी च्या सहाय्यक आयुक्त गिता गुन्हे, प्राचार्य श्रीतुळशीराम पालवे, मार्गदर्शक सुनील कलवले याच्यासह सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# अत्याचार करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला अटक

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** उमरखेड येथे शाळेत निघालेल्या पाचव्या वर्गातील बालिकेला दुचाकीवर सोडून देण्याच्या बहाण्याने नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अखेर अटक केली. अजिज खान मोहमद खान पठाण (४९)असे या आरोपीचे नाव आहे. १० ऑक्टोबर रोजी शाळेला जाण्यासाठी निघालेल्या ११ वर्षीय मुलीला आरोपी अजिजने पळशी बसथांब्यावर साडेदहा वाजता गाठले. बसची वाट पाहत असलेल्या या मुलीला भावनिक बतावणी करून आरोपीने आपल्या दुचाकीवर बसवून बेलखेड शिवारात नेले. तेथे बळजबरी अत्याचार केला.

# मालमत्ता करात ५ टक्के सूटचा लाभ घ्या ३१ डिसेंबरपर्यंत

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** नियमित मालमत्ता कर भरणा करणाऱ्यांकरीता प्रोत्साहन म्हणुन ३१ डिसेंबरपर्यंत मालमत्ता कराचा एकमुस्त भरणा केल्यास चालू आर्थिक वर्षासाठी ५ टक्के सूट देण्याची योजना मनपातर्फे जाहीर करण्यात आली आहे.

मालमत्ता कर हे मनपाच्या उत्पन्नाच्या प्रमुख स्त्रोतांपैकी एक आहे. शहरासाठी नियमित सोयी सुविधा पुरविण्यास मालमत्ता कराची अधिकाधिक वसुली होणे गरजेचे आहे. महापालिका क्षेत्रात जवळपास ८० हजार मालमत्ता असून, संपूर्ण मालमत्तांच्या माध्यमातून दरवर्षी सुमारे मागणी नोंदवली जाते. करदात्यांना कराची नोटीस पाठवून कर भरणा करण्यासाठी विनंती करणे




ही कर विभागाची पहिली प्रक्रिया मानली जाते. जास्तीत जास्त वसुली होऊन ती शहराच्या विकास कामांसाठी उपयोगी यावी या अनुषंगाने करवसुलीस प्राधान्य दिले जाते.

करभरणा हा प्रत्यक्ष कार्यालयात जाऊन अथवा HTTPS:// CHANDRAPURMC.ORG या लिंकवर मालमत्ता कराचा ऑनलाईन भरणा करता येणे शक्य आहे तसेच ऑनलाइन युपीआय ॲप अर्थात फोन पे, गुगल पे, भीम ॲप ( भारत इंटरफेस फॉर मनी ) यांचाही पर्याय मनपाने उपलब्ध करून दिलेला आहे. मालमत्ता व पाणी करात देण्यात येत असलेली सुट ही औद्योगीक मालमत्तेस लागु राहणार नाही. एकुण मालमत्ता व पाणी करात सदर सुट देण्यात येत असल्याने मालमत्ता कर त्वरित भरण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

# रेणुकादेवी नवरात्र महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** लोहा तालुक्यातील मौजे पोलेवाडी गडावर दि. १५ ऑक्टोबर पासून प्रसिद्ध श्री रेणूकादेवी संस्थान पोलेवाडी ता.लोहा, जि.नादेडच्या वतीने श्री रेणुकादेवी नवरात्र महोत्सवास भरगच्च कार्यक्रमांनी प्रारंभ होणार आहे.

लोहा तालुक्यातील मौजे पोलेवाडी गडावरील श्री रेणुकादेवी ही प्रति माहूर गडावरील श्री रेणुकादेवी म्हणून ओळखले जाते. पोलेवाडी गडावरील श्री रेणुकादेवी ही माहूरच्या श्री रेणुकादेवी प्रमाणे लोहा, कंधार,पालम, अहमदपूर तालुक्यासहीत नांदेड, लातूर ,परभणी जिल्ह्यासहीत तेलंगणा, आंध्रप्रदेश, कर्नाटक राज्यात ही श्री रेणुकादेवीचे हजारो भाविक भक्त आहेत व ते दरवर्षी नवरात्र महोत्सवात पोलेवाडी येथे श्री रेणुकादेवीच्या दर्शनासाठी येतात.

दरवर्षी प्रमाणे यंदाही पोलेवाडी येथील श्री रेणुकादेवी नवरात्र महोत्सवानिमित्त भरघोस कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यात दि.१५-१०-२०२३ रोजी सकाळी महापुजा , अभिषेक , दिवसभरात घटस्थापना,व रात्री वैष्णवी भजनी मंडळाचा कार्यक्रम रात्री ८ ते ११, दि. १६-१०-२०२३ रोजी सकाळी महापूजा व अभिषेक, दिवसभरात देविच्या आराध्यांचा मेळावा ,रात्री दत्त सांप्रदायिक भजन दतमार्गी भजनी मंडळ पोलेवाडी यांचे भजन, दिली.१७-१०-२०२३ सकाळी महापूजा व अभिषेक दिवसभरात जि.प. प्रा.शाळा पोलेवाडी येथील इयत्ता १ ली ते ७ वी विद्यार्थ्यांची खुर्ची रेस, रात्री देविच्या आराध्यांची गाणी देवकर मंडळी पोलेवाडी - लोहा, दि.१८-१०-२०२३ सकाळी महापूजा व अभिषेक दिवसभरात इयत्ता १ ली ते ७ वी मुलांची कब्बडी स्पर्धा,रात्री संगित भजन पोलेवाडी,



दि.१९-१०-२०२३ सकाळी महापूजा व अभिषेक दिवसभरात श्री रेणुकादेवी सार्वजनिक वाचनालय पोलेवाडी यांच्या वतीने इयत्ता १ ली ते ७ विद्यार्थ्यांची वाचन स्पर्धा,लेखन स्पर्धा, वूक्तत्व स्पर्धा, रात्री वैष्णवी भजनी मंडळ दत्तमार्गी संगीत भजनी मंडळी पोलेवाडी यांचा सामुहिक भजनाचा जागर, दि.२०-१०-२०२३ सकाळी महापूजा व अभिषेक दिवसभरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यस्मरणानिमित प्रा.मुरहरी कुंभरगावे ( होळकरशाहीचे गाढे अभ्यासक) नांदेड यांचे सकाळी ११ वाजता व्याख्यान ,रात्री हरीजागर किर्तन, दि. २१-१०-२०२३ सकाळी महापूजा व अभिषेक दिवसभरात महाप्रसाद नांदेडकर मित्रमंडळाच्या वतीने तसेच कै.अशोक गोपनर यांच्या स्मरणार्थ कब्बडीचे खुले सामने प्रथम बक्षीस २१००० रु. दुसरे बक्षीस११००१ रू.,तिसरे बक्षीस ५१०१ रु., चौथे बक्षीस २५५५ रू.दि.२२-१०-२०२३ सकाळी महापूजा व अभिषेक दिवसभरात रक्तदान शिबीर,रात्री होमवहन, दिली.२४-१०-२०२३ सकाळी महापूजा व अभिषेक दिवसभरात दसरा सिमोलगन पालखी दुपारी ३.४७, रात्री वैष्णवी दतमार्गी भजनी मंडळी, संगीत भजनी मंडळ पोलेवाडी यांचे सामुहिक भजनाचा जागर असे भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून यांचा लाभ सर्व भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन एन.एन. देशपांडे ( संस्थापक अध्यक्ष), एस.जी. धुळगुंडे, एम एन पोले (सचिव) बी.एल . शक्करवार( कोषाध्यक्ष), शेषराव बाजगीर (विश्वस्त), के.एस. कंधारे ( विश्वस्त), व्यंकटी पोले ( मानकरी), माधव पोले ( मानकरी) मोकिंदा पोले, शिवदास पोले, तेजेराव बाजगीर, पिराजी धुळगुंडे, यांच्या सहित समस्त गावकरी मंडळी पोलेवाडी यांनी केले आहे.

# वाढदिवसाचा खर्च टाळून गिरिजा आश्रमात केले अन्नदान; म्हात्रे परिवाराचा पुढाकार

आधुनिक केसरी न्यूज

**हेमंत धायगुडे**

**पनवेल :** वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून हिंदू सनातन तिथीप्रमाणे कु.मिहीर अक्षय म्हात्रे याच्या प्रथम वाढदिवसानिमित्त म्हात्रे परिवाराच्या वतीने खारघर येथील गिरीजा वेल्फेअर असोसिएशनचे गिरीजा शैक्षणिक वसतीगृहात राहणाऱ्या अनाथ बालकांना पंच पकवान शाही अन्नदान केले. वाढदिवसाच्या निमित्ताने अक्षय हरिश्चंद्र म्हात्रे यांनी वसतीगृहात राहणाऱ्या अनाथ बालकांना डाळ, भात, मटर भाजी, मिक्स भाजी, हिरवी भाजी, पुरी, पापड, केशर मोतीचूर लाडू, खीर असे शाहीभोजन व गोड पदार्थ खाऊ घातले. अक्षय हरिश्चंद्र म्हात्रे हे युवा उद्योजक आहेत.याप्रसंगी हरिश्चंद्र रामकृष्ण म्हात्रे, आशा हरिश्चंद्र म्हात्रे, अक्षय हरिश्चंद्र म्हात्रे, तनुजा अक्षय म्हात्रे व गिरिजा वेल्फेअर असोसिएशनचे पदाधिकारी व सेवकवृंद उपस्थित होते.



# उरण आगारात हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** हिंदयुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान सन २०२३- २०२४ अंतर्गत दि. ११ / १० / २०२३ रोजी स्वच्छता अभियान तपासणी करीता रा. प. रायगड विभागातुन विभाग नियंत्रक दिपक घोडे, विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी सुहास कांबळे, उप यंत्र अभियंता चेतन देवधर व विभागीय सांख्यिकी अधिकारी श्रीमती. प्रियांका बुधवंत तसेच, रा. प. मुंबई विभागाचे अमोल चौगुले यांच्या गठीत समितीने उरण बसस्थानक व परिसर आगार परिसराची तपासणी केली. सदर तपासणीतवेळी उरण तालुक्यातील जेष्ठ पत्रकार रायगड भूषण एल. बी. पाटील व कोकणवाशीय उत्कर्ष संस्था व मेढे ग्रामविकास मंडळ सचिव रविंद्र चव्हाण हजर होते. त्यावेळी रायगड विभाग नियंत्रक दिपक घोडे व एल. बी. पाटील व चव्हाण यांच्यासोबत सुसंवाद झाला. त्यावेळी रा. प. उरण आगाराविषयी समाधानकारक मत एल बी पाटील व रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केले. त्यावेळी घोडे यांनी रा. प. महामंडळातर्फे त्यांचे आभार व्यक्त करुन स्वच्छता तपासणीचे कामकाज पुर्ण केले. एल बी पाटील यांनी उरण आगारामार्फत मराठी भाषा गौरव दिन, रा. प. महामंडळाचा वर्धापन दिन, प्रवाशी वाढवा अभियान, इंधन बचत मोहीम यासारख्या लोकोपयोगी मोहीम उरण आगारात राबविल्या जातात. ही बाब प्रवाशी जनतेच्या दृष्टीने अत्यंत मौलिक आहे. असे नमुद केले.

तसेच सदर स्वच्छतेमोहीमेमध्ये उरण बसस्थानकाचे सुशोभिकरण व रंगरंगोटीकरीता उरण तालुक्यातील समाजसेवक व द्रोणागीरी सांस्कृतीक व किडा मंडळाचे संस्थापक महादेव घरत यांच्या सौजन्याने आर्थिक योगदान देऊन उरण बस स्थानकाला नवसंजीवणी देऊन प्रवाशी जनतेकरीता मोलाचे योगदान दिले आहे.असे सांगितले.आगारातील आगार व्यवस्थापक सतिश मालचे,अमोल दराडे, सहाय्यक वाहतुक निरीक्षक दिनेश कदम, दि. पी. तारेकर, धनंजय,वाहतुक निरीक्षक पाटील, तानाजी भोईर व रा. प. कर्मचारी यांचे सदर अभियानास मोलाचे सहकार्य लाभले आहे.

# फैज अहमद दिग्दर्शित अहिराणी चित्रपट 'चितांग'मधील गीतांचे विमोचन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आयमन फिल्मस प्रस्तुत आरिफ शेख यांची निर्मिती असलेला आणि दिग्दर्शक फैज अहमद यांनी दिग्दर्शित केलेला 'चितांग' या अहिराणी चित्रपटातील गीतांचे जेष्ठ कथा गीतकार, लेखक विश्राम बिरारी यांच्या हस्ते धुळ्यात पत्रकार भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत गुरुवार दि. १२ ऑक्टोबर रोजी विमोचन करण्यात आले. याप्रसंगी चित्रपटाचे कथा, पटकथा लेखक व दिग्दर्शक फैज अहमद, जेष्ठ कलावंत विश्वासराव भामरे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाचे सदस्य चंद्रशेखर पाटील, नाट्य-चित्रपट कलावंत भटू चौधरी, सुभाष शिंदे, पत्रकार संघाचे सचिव सचिन बागुल यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते.

फैज अहमद यांनी सुमारे १० वर्षांपूर्वी 'चंदन' हा पहिला अहिराणी चित्रपट दिग्दर्शित केला होता. मोठ्या कालावधीनंतर अथक परिश्रमातून त्यांनी आता 'चितांग' हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे. या चित्रपटातील 'दन दन करत चालनं हाई गाडं' व 'कीतल्या मार्शल गाड्या हो शिट्ट्या' या दोन गीतांचे पत्रकार परीषदेत विश्राम बिरारी यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. येत्या २७ ऑक्टोबर रोजी 'चितांग' हा चित्रपट धुळे शहरातील ज्योती टॉकीज येथे प्रदर्शित केला जाणार आहे. या चित्रपटात मुंबईतील स्टार कलाकारांसह खान्देशातील अनेक कलावंतांनी भूमिका साकारल्या आहेत. सामाजिक व कौटुंबिक विषयावरील हा चित्रपट आहे. खान्देशातील अहिराणी व मराठी भाषिक कुटुंबांनी एकत्र येऊन हा चित्रपट अवश्य पाहावा असे आवाहन यावेळी फैज अहमद यांनी केले.




गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर